बावा (७) ३०७

## आम्ही कोण म्हणूनी

जगातले सर्वांत मोठे काव्य गणले जायचा मान संस्कृत महाभारताला मिळाला आहे. ग्रीक भाषेतली दोन महाकाव्ये-इलियड आणि ओडिसी–यांच्या ते सातपट आहे.

■

जगातील दंतकथांचा मोठा भाग भारतातूनच बाहेर गेला आहे.

■

दशांश पद्धती शोधून काढावयाचा मान भारतालाच मिळाला आहे. शिवाय बीजगणितही इथेच जन्मले.

■

प्राचीन लोहाचा उत्कृष्ट नमुना म्हणून दिल्लीतल्या स्तंभाकडे बोट दाखवले जाते. तो आहे इ. स. ३१० मधला. त्याचे वैशिष्टय हे की, त्याला गंज चढत नाही. तो २२ फूट उंच असून त्याचे वजन ६ टन असावे, असे सांगण्यात येते.

■

भारताची पहिली प्राचीन लिपी 'ब्राह्मी' होती, आणि इथल्या वेगवेगळ्या लिप्या तिच्यातूनच उगम पावल्या आहेत.

■

जगातले पहिले वर्तमानपत्र भारतात २९ जानेवारी, १७८० मध्ये सुरू झाले. ते होते जेम्स हिकीने सुरू केलेले 'बंगाल गॅझेट.'

■

बुद्धिबळाची सुरुवातही भारतातल[illegible]नातून ते इराणला गेले.

BVBK-0400307

# देशोदेशींच्या लोकोक्ती

लोकोक्ती म्हणजे म्हणी. आपल्या देशातल्या खूप म्हणी तुम्हांला माहीत असतील.

पुढे दिलेल्या साऱ्या म्हणी परदेशातल्या.

**पॅलेस्टाईन**

देवाला सर्व ठिकाणी जाता येईना, म्हणून त्याने माता निर्माण केली.

**अरबस्तान**

ज्याच्याजवळ स्वास्थ्य आहे, त्याच्याजवळ आशा असते. आणि ज्याच्याजवळ आशा असते, त्याच्याजवळ सर्व काही.

**डेन्मार्क**

लक्ष्मी नेहमीच दरवाजा ठोठावते; पण मूर्ख माणसे तिला घरातच घेत नाहीत.

**जर्मनी**

कर्ज घेऊन उठण्यापेक्षा उपाशी पोटी झोपलेले अधिक चांगले.

**हॉलंड**

दारिद्र्य हे आळसाचे पारितोषिक आहे.

**इटली**

कुठलेही आश्चर्य तीन दिवसांपेक्षा अधिक काळ टिकत नाही.

**रशिया**

सल्ला-मसलत देणारे अनेक असतात; पण मदत देणारे थोडे.

**[illegible]**

एक माणूस आळसाने जगतो, तर दुसरा भुकेने मरतो.

**झेकोस्लोव्हाकिया**

वस्तू विकत घेताना डोळ्यांचा उपयोग करा, कानांचा नाही.

## गुप्त म्हणी

काही तरी गोडबंगाल वाटते, नाही ? पण पहिल्या आकृतीत दोन आणि दुसरीत तीन म्हणी लपून बसल्या आहेत. आकृतीतील अक्षरे कशी वाचावीत एवढे तुम्हांला हेरता आले, तर मग नक्कीच मिळतील त्या पाच म्हणी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ | शि | न्ना | क | चा |
| वि | मा | ले | र | ली |
| ले | बु | ला | द्धि | खा |
| आ | ली | णि | पा | बां |
| ही | ध | त | ले | र |
| ली | वा | शि | री | दो |
| चा | री | मा | फा | र |
| र | ले | के | ला | ळ |
| व | पु | र | र | पा |
| त | ही | ना | ❋ | ही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गां | रा | च् | ठ | जा |
| ढे | चा | बो | ल | ए |
| ले | तो | क | ह | प |
| बा | ळ | डे | हे | हा |
| ल | र | ले | आ | च्या |
| का | णि | शं | जी | पो |
| भ | बो | हे | रा | ले |
| ल | ब | दा | तो | रो |
| ढी | बु | ब | हा | डे |
| र | ले | ल | ❋ | ❋ |

## अमरवाणी

चार हजार वचनांतून मी फक्त चारच सुभाषिते निवडली आहेत. दोन नित्याच्या स्मरणाकरिता : मालक आणि मृत्यू; आणि दोन विसरून जाण्याकरिता : दुसऱ्यावर केलेले उपकार आणि दुसऱ्याने केलेला अपकार.

— हकीम लुकमान

वाईट कृत्ये करावयाची संधी दिवसातून शंभर वेळा येते. पण चांगली कृत्ये करावयाची संधी मात्र वर्षात एखाद्या वेळेसच.

— व्हॉल्टेअर

चंद्र आणि तारे नसलेली रात्र म्हणजे अज्ञान.

— कन्फ्यूशियस

निंदेपासून बचाव करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्वतःच्या अंगचे दोष काढून टाकणे.

— डेमॉस्थेनिस

एखाद्या मूर्तीप्रमाणेच माणसाचे आयुष्य साऱ्या बाजूंनी सुंदर असायला हवे.

— सॉक्रेटिस

ह्या जगात मी जे काही पाहिले, त्याने मला हेच शिकविले की, जे काही मीं पाहिले नाही, त्याच्याकरिता मी जगन्नियंत्यावर विश्वास ठेवावा.

— इमर्सन

लढाईत निश्चित विजय मिळणार असेल, तर मग एखादी भित्री भागुबाईसुद्धा लढेल; पण मला असा माणूस पाहायचा आहे की, जो लढाईत पराभव होणार आहे, हे माहीत असूनसुद्धा लढण्याचा पराक्रम दाखवतो.

**– जॉर्ज इलियट**

जो युद्धक्षेत्रावरून पळून जातो, तो दुसऱ्या दिवशी लढण्याकरिता जिवंत राहतो; पण युद्धात जो धारातीर्थी पतन पावतो, त्याला दुसऱ्यांदा लढण्याकरिता कधीच उठावे लागत नाही.

**– गोल्डस्मिथ**

माणसांवर भयंकर संकटे येऊ लागली की, ती पायांनी विचार करतात.

**– बायर्स**

□

## राणीचा बाग

पुढील आकृतीतील चौकोनात दिली आहेत राणीच्या बागेतील सोळा पशुपक्ष्यांच्या नावांची अक्षरे. ती जुळवून ह्या पशुपक्ष्यांचा शोध लावण्यात डोके खर्च करावयाचे नसल्यास, आकृतीतील १ ते ५५ क्रमांक असलेल्या चौकोनातील अक्षरे त्यांच्या संख्यानुक्रमाने एकापुढे एक ठेवून वाचा की, हे सारे प्राणी तात्काळ मिळतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ हा | २० मृ | २१ ग | २६ नी | २७ ल |
| १८ श | १७ ट | २२ का | २५ वा | २८ गां |
| १५ ळ | १६ वी | २३ का | २४ कु | २९ य |
| १४ का | १३ र | ३२ स | ३१ र | ३० सा |
| ११ ज | १२ ग | ३३ का | ३६ म | ३७ ग |
| १० अ | ९ डा | ३४ स | ३५ व | ३८ र |
| ७ ण | ८ घो | ४१ फ | ४० रा | ३९ जि |
| ६ पा | ५ घ | ४२ ह | ४७ र | ४८ क |
| ३ ळचा | ४ वा | ४३ र | ४६ ब | ४९ र |
| २ ब | ५५ ह | ४४ ण | ४५ सां | ५० को |
| १ बि | ५४ सिं | ५३ ता | ५२ चि | ५१ चा |

## तुम्हाला हे माहीत आहे काय ?

१) पंजाबमध्ये आहेत, इतके कालवे जगात कुठे नाहीत.

२) जमशेटपूर येथे असणारा टाटांचा पोलाद कारखाना. भारतातला सर्वांत मोठा पोलाद कारखाना आहे.

३) साऱ्या जगात आइसलॅंड हे एकच स्थान असे आहे की, जिथे वृक्षही नाहीत आणि आगगाड्याही नाहीत.

४) जी. आय. पी. (मध्ये रेल्वे) ही भारतातील सर्वांत जुनी रेल्वे आहे. ती १८५३ मध्ये सुरू झाली.

५) ट्रान्स सायबेरीयन रेल्वे ही जगातली सर्वांत लांब रेल्वे आहे.

६) इंग्लंडच्या राणीच्या मुगुटात असणारा प्रसिद्ध भारतीय कोहिनूर हिरा गोवळकोंड्याच्या खाणीत मिळाला होता.

७) 'बॉयकॉट' ह्या इंग्रजी शब्दाचा उगम आयर्लंडमधला. कॅप्टन बॉयकॉट नावाच्या घरमालकावर, त्याच्या शेजाऱ्यांनी आणि व्यापाऱ्यांनी सामाजिक बहिष्कार टाकला होता.

८) भारतातील सर्वांत उंच पर्वतशिखर नंदादेवी २५,६५४ फूट आहे.

९) चहा प्यायची सुरुवात चिनी लोकांनी प्रथम केली.

१०) एक चौरस मैल क्षेत्रफळ असलेला मोनॅको देश जगातला सर्वांत लहान देश आहे.

११) जगात माणसा इतकेच उंदीरही आहेत, असे एका शिरगणतीत दिसून आले आहे.

( बाकी पुढल्या पानावर )

## तुम्हाला हे माहीत आहे काय ? ( पुढे चालू )

१२) उत्तर ध्रुवावर प्रथम पाऊल टाकले जनरल पिअरी यांनी.

१३) पहिली मोटर-गाडी, ऑस्ट्रेलियात, सिगफ्रीडने १८७५ त तयार केली होती.

☐

## शोधून काढा पाहू हा चोर

अरबांचा एक काफिला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणाकडे चालला होता.

बरोबर होते काफिल्याचे मुख्य शेखसाहेब, त्याचप्रमाणे एक शेटजीही.

शेटजींचा व्यापार होता हिऱ्या-मोत्यांचा.

त्यांना भीती वाटत होती, बरोबर घेतलेले जडजवाहर कुणी लुटले, तर !

शेटजींची 'धकधक' शेखसाहेबांच्या लक्षात आली.

तथापि शेखसाहेबांनी त्यांना समजावले-

'शेटजी, तुम्ही मुळीच धाबरू नका. तुमच्या ऐवजाला कुणीही हात लावणार नाही !'

शेखसाहेबांनी शेटजींना असेही सांगितले की, त्यांनी काफिल्याबरोबर एक पांढरे गाढव घेऊन ठेवले होते आणि अरब लोक पांढऱ्या गाढवाला पवित्र मानत असल्यामुळे, काफिल्यातील अरबांकडून तरी निदान चोरी होण्याची भीती सुतराम् नव्हती.

तदनंतर आपल्या एका सरदाराला बोलावून शेखसाहेबांनी सूचना दिली—रोज रात्री पवित्र, पांढऱ्या गर्दभराजाचे शेपूट अत्तराच्या भांड्यात बुडवून ठेवायचे.

गर्दभराजाचे पावित्र्य टिकवण्याकरिता रोज ही उपासना करणे अगत्याचे होते, असे त्यांनी त्या सरदाराच्या मनावर बिंबवले.

दिवसामागून दिवस उलटत गेले.

जवळजवळ तीन–चतुर्थांश सफरही पार पडली.

आणि मग एके दिवशी सकाळी शेटजी उठले, तेच कपाळ पिटीत—

त्यांचे सारे जडजवाहीर चोरीला गेले होते.

रडत–ओरडत शेटजी शेखसाहेबांकडे आले आणि घडलेली सारी हकीगत त्यांनी त्यांच्या कानावर घातली.

शेखसाहेबांनी आपल्या मित्राला शांत व्हायला सांगितले. नंतर त्यांनी साऱ्या लोकांना आपल्या तंबूत बोलावले.

—आणि हुकुमाप्रमाणे सारा काफिला हजर झाल्यावर शेखसाहेब म्हणाले,

'ज्या कुणी शेटजींचं जडजवाहीर नेलं असेल, त्यानं ते तात्काळ त्यांना परत करावें.'

पण चोरीला गेलेली शेटजींची मालमत्ता घेऊन कुणीच पुढे आला नाही.

शेखसाहेब अधिकच संतापले.

गरजले–

'ठीक. चोर स्वतःहून पुढं यायला तयार नसेल, तर आम्ही त्याला आमच्या दैवी गर्दभराजाच्या मदतीने शोधून काढू.' साऱ्या काफिल्यावर आपली क्रुद्ध नजर फिरवत ते पुढे म्हणाले,

'तुम्ही साऱ्यांनी एक गोष्ट करायची. गर्दभराजाला ज्या तंबूत बांधला आहे, तिथं एकेकटयानं पाळीपाळीनं, जाऊन त्याच्या शेपटाचं टोक फक्त तीन वेळा आपल्या हातात धरायचं. तुमच्यापैकी जो चोर असेल, त्यानं गर्दभराजाचं शेपूट हातात धरताच गर्दभराज ओरडू लागेल. करा सुरुवात.' साऱ्या अरबांनी आपल्या मुख्याच्या सांगण्याप्रमाणे केले; पण गर्दभराजाच्या ओरडण्याचा आवाज कुणाच्याच कानी आला नाही.

हा सारा प्रकार पाहून शेटजी हतबुद्ध झाले.

हताश होऊन हळहळले,

'शेखसाहेब, तुमचा दैवी गर्दभराज निकामी ठरला हो !' पण शेखसाहेबांनी त्यांना समजावले,

'शेटजी, घाबरू नका, माझ्या गर्दभराजानं बरोबर न्याय दिला आहे–तो मुळीच निकामी ठरलेला नाही. दाखवतो मी तुम्हांला चोर !'

आणि खरोखरच शेखसाहेबांनी नेमका चोर पकडला.

कसा, सांगता येईल तुम्हांला ?

□

## कोण कोण गेले सहलीला ?

सहलीची आखणी झाली होती. वर्गशिक्षकांनी वर्गप्रमुखाला सहलीत भाग घेणाऱ्यांची नावे टिपून ठेवायला सांगितली. त्याने ही सारी आडनावे, त्यांच्यातील अक्षरांची उलटापालट करून लिहिली. ह्या अक्षरांची योग्य जुळणी करून, येतील तुम्हांला सहलीत भाग घेणाऱ्या मुलांची नावे सांगता ? फक्त त्या त्या ओळीतल्याच अक्षरांची जुळणी करायची, हे लक्षात ठेवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ क | को | ट | र | ल्ह |
| २ फ | णी | र | ळ | क |
| ३ शं | न | य | वै | पा |
| ४ गा | रे | र | शृं | पु |
| ५ क | स | के | र | ळु |
| ६ का | ळ | र | रू | क |
| ७ ळे | ग | र | जो | क |
| ८ क | ह | प | ळे | र |
| ९ इ | म | र | ना | दा |
| १० क | व्हा | र | ग | ण |

□

## सांगा पाहू हे देशभक्त

पुढे दिसत असलेल्या आणि गटागटाने दिलेल्या अक्षरांची योग्य जुळवाजुळव करता आल्यास आपल्या दहा जुन्या-नव्या देशभक्तांची नावे तुम्हांला सहज सांगता येतील.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ज | श | ह | हा | ता | फे | मे | रो |
| २ | ज | य | प | त | ला | ल | ला | रा |
| ३ | गो | गो | ले | कृ | पा | ख | ळ | ष्ण |
| ४ | वि | टे | ल | ठ्ठ | प | ल | भा | ई |
| ५ | गो | द | व | विं | त | पं | भ | ल्ल |
| ६ | मा | सा | श्या | मु | प्र | द | ख | र्जी |
| ७ | आ | र्य | नो | वि | भा | बा | चा | वे |
| ८ | बा | रा | बू | जें | द | द्र | प्र | सा |
| ९ | सी | री | गो | रा | चा | पा | ला | ज |
| १० | शा | र | हा | ब | ला | दु | स्त्री | ल |

□

## शोधा ही फळे

पुढे दिलेल्या आकृतीतील अक्षरांच्या साहाय्याने नऊ फळांची नावे जुळवायची आहेत. येईल तुम्हांला हे करता ? पाहा. नाही तर १ ते ३८ क्रमांक असलेल्या चौकोनातील अक्षरे, उलटच्या क्रमाने एकापुढे एक ठेवून वाचत राहा, म्हणजे तुम्हाला ही फळे मिळतील.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ३२ र | ३१ बू | २८ र | २७ वं | |
| ३४ द | ३३ ट | ३० ज | २९ क | २६ दे | २५ अ |
| ३५ चं | ३६ र | ३७ फ | २२ स | २३ न | २४ न |
| १६ म | १७ रा | ३८ स | २१ प | २ के | १ ळी |
| १५ फ | १८ स | १९ न | २० प | ३ ळी | ४ जा |
| १४ ळ | १३ सी | १० ळ | ९ ना | ६ ती | ५ रा |
| | १२ ता | ११ फ | ८ श | ७ प | |

□

## खेळ खेळू या गमतीचे

रविवारी किंवा सुटीच्या दिवशी वेळ कसा घालवावा, असा प्रश्न कधी कधी तुमच्यासमोर उभा राहतो. शिवाय नित्याचे तेच तेच खेळ वारंवार खेळायचा तुम्हांला कंटाळा येतो. म्हणूनच काही नवीन खेळायला मिळावे म्हणून पुढे काही खेळ दिले आहेत :

### हसा आणि हसवा

खेळात भाग घेणाऱ्या साधारणपणे सहा ते आठ मुलांनी आपल्यापैकी एकालाच 'राज्य' घ्यायला लावायचे. इतरांनी अगदी गप्प राहायचे.

खेळाला सुरुवात केल्यानंतर राज्य घेतलेल्या मुलाने इतरांना कशाही प्रकारे हसवायचा अथवा बोलायला लावायचा कसून प्रयत्न करायचा. हे करताना त्यांच्या अंगाला मात्र मुळीच हात लावायचा नाही.

राज्य घेतलेल्या मुलाने, एखाद्याला वाकुल्या दाखवून, नाचून, नाना अंगविक्षेप करून अथवा पटकन् वेडगळ प्रश्न विचारूनही हसायला किंवा बोलायला लावले, तर तो मुलगा 'बाद' झाला, असे समजायचे आणि त्याने राज्य घेऊन पुढे खेळाला सुरूवात करायची.

### कोल्हा, कोंबडी आणि तिची पिले

एका मुलाने व्हायचे कोल्हा, एका मुलीने कोंबडी, इतरांनी तिची पिले. पिल्लांनी कोंबडीच्या कमरेला धरून, एकाच्या मागे एक उभे राहायचे. सगळ्यांत छोटया पिल्लाने शेवटी राहायचे. कोल्ह्याने दूर उभे राहायचे.

खेळ सुरू झाला की, कोल्ह्याने कोंबडीच्या शेवटच्या

पिल्लाला 'पळवायचा' प्रयत्न करायचा, तर कोंबडीने त्याला कसाही प्रतिबंध करायचा.
काही हिकमतीने अथवा हुलकावणीने हे पिल्लू 'पळवलेंच,' तर तो मुलगा (पिल्लू) बाद समजून त्याच्या जागी दुसरा लहान मुलगा उभा करून, खेळाला परत सुरुवात करायची.
काही वेळाने कोल्हा आणि कोंबडी यांनी आपापल्या जागा बदलून हा खेळ खेळावा. □

## खेळ आणि खेळाडू

पहिल्या विभागात दिलेल्या खेळात दुसऱ्या विभागातील खेळाडूंनी नावे कमावली आहेत. सांगता येईल तुम्हांला कोण खेळाडू कुठला खेळ खेळत होता ते ?

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रिकेट | हॉकी | टेनिस | कुस्ती | गोल्फ | धावणे |
| फुटबॉल | बॅडमिंटन | नेमबाजी | टेबल-टेनिस | गिर्या-रोहण | जलतरण |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| आरती साहा | भरत-राम | दारासिंग | गौतम दिवाण | जेंटल | हनीफ | करणी-सिंग |
| बलबीर-सिंग | चुनी गोस्वामी | जयदीप मुखर्जी | जर्नेल-सिंग | ध्यानचंद | आर्. कृष्णन् | मिहिर सेन |
| बेदी | नायडू | मिल्खा-सिंग | नरेश-कुमार | उधम-सिंग | मेवालाल | गणपत आंदळकर |
| चंदगीराम | नंदू नाटेकर | पुष्पा आठवले | नाडकर्णी | प्रेमजित लाल | वाडेकर | हजारे |

...२...

□

## पुऱ्या करा ह्या म्हणी

फक्त गाळलेले शब्द भरून–एक ओळ म्हणजे एकच शब्द.

१ ) तळे ………… तो ………… चाखील.
२ ) ………… शहाणा ………… बैल …………
३ ) वारा ………… पाठ द्यावी.
४ ) ………… हाती ………… तो …………
५ ) नाक ………… म्हणजे ………… उघडते.
६ ) ………… मूठ …………लाखाची.
७ ) गेली घडी ………… नाही.
८ ) …………विद्या…………धन.
९ ) काडीची……… आणि…… मत्ता …… होत ….
१० ) ……… गाईत ……… गाय………
११ ) पोटचे ……… पण ……… देऊ ………
१२ ) ………… रडतात ………… हसतात.
१३ ) आपला ………… आणि…………
१४ ) ………… बुद्धी ………… लक्ष्मी …………
१५ ) खाऊ ………… तो………… जाणे.
१६ ) ………… नाही ………… डर …………
१७ ) मन ………… मन …………
१८ ) ………… गोंधळ आणि ………… सुकाळ.
१९ ) एका………… टाळी………… नाही.
२० ) …… वाचली …… कालचा …… बरा ……

## गणितातील गंमत– १

प्रत्यक्ष करून पाहाच–

(१) कुठलीही दोन अंकी संख्या (उदा.१५) तीनदा शेजारी-शेजारी लिहिली (१५ १५ १५), तर तिला ७ आणि १३ ने निःशेष भाग जातो.

(२) कुठलीही पाच अंकी संख्या (उदा. १२३४५) तीनदा शेजारी–शेजारी लिहिली (१२३४५१२३४५१२३४५), तर तिला ३१ ने निःशेष भाग जातो.

(३) कुठलीही सहा अंकी संख्या (उदा. १२३४५६) तीनदा शेजारी-शेजार लिहिली (१२३४५६१२३४५६१२३-४५६), तर तिला १९ ने निःशेष भाग जातो.

(४) कुठलीही सात अंकी संख्या वर सांगितल्या-दाखविल्याप्रमाणे तीनदा शेजारी-शेजारी लिहिली, तर तिला ४३ ने निःशेष भाग जातो.

(५) कुठलीही अकरा अंकी संख्या वर सांगितल्या–दाखविल्या-प्रमाणे तीनदा शेजारी–शेजारी लिहिली, तर तिला ६७ ने निःशेष भाग जातो.

(६) कुठलीही वीस अंकी संख्या वर निर्देशिल्याप्रमाणे तीनदा शेजारी-शेजारी लिहिली, तर तिला ६१ ने निःशेष भाग जातो.

(७) कुठलीही बत्तीस अंकी संख्या वर निर्देशिल्याप्रमाणे तीनदा शेजारी-शेजारी लिहिली, तर तिला ९७ ने निःशेष भाग जातो.

विभाग.
दिनांक ......

## ‘क’चे कडबोळे

दिलेल्या अर्थाच्या मदतीने आणि ‘क’ ह्या अक्षरानेच सुरू झालेले फक्त तीनच अक्षरी असे पुढील शब्द शोधून काढता येतील ?

सोने — क……
कळी — क……
लक्ष्मी — क……
तास — क……
लेखणी — क……
पारवा — क……
ठराव — क……
कमंडलू — क……
मिळवता — क……
वागणूक — क……
अर्धा नारळ — क……
कापडी भिंत — क……
रागाची दृष्टी — क……
लहान मुलगी — क……
अवश्य काम — क……
मोठी लाट — क……
लहानसे पूजापात्र — क……
गुणांची पारख — क……
पायघोळ झगा — क……
पिंगटरंगी गाय — क……

□

## शोधा हे पशुपक्षी

पुढे दिलेल्या आकृतीत सात पशु-पक्ष्यांच्या नावांची अक्षरे लपून बसलेली आहेत. ह्या साऱ्या पशु-पक्ष्यांच्या नावांचे पहिले अक्षर पहिल्या रकान्यात आणि उरलेली तीन-सारी नावे चार अक्षरीच आहेत-दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या रकान्यात अनुक्रमे इतस्ततः पसरून दिली आहेत. शोधून काढता येतील तुम्हांला हे सारे पशुपक्षी ?

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| अ | ळ | ग | ट |
| क | ल | को | य |
| का | ण | मृ | डा |
| का | हा | घो | ग |
| नी | का | गा | वा |
| पा | र | वी | चा |
| श | ज | कु | र |

□

# ऐतिहासिक स्थळे

पुढे दिसत असलेल्या दोन विभागांपैकी पहिल्यात ऐतिहासिक वास्तूंची नावे दिली आहेत, वर दुसऱ्यात त्या जिथे आहेत, त्या शहरांची. ह्या दोन विभागांतील गोष्टींची योग्य सांगड घालता येईल तुम्हांला ?

| विभाग पहिला | विभाग दुसरा |
|---|---|
| ताजमहाल | दिल्ली |
| विजयस्तंभ | बनारस |
| चार मिनार | अमृतसर |
| शहीद–स्तंभ | फतेहपूर सिक्री |
| आनंद भवन | आग्रा |
| सुवर्णमंदिर | चितोड |
| कुतुब मिनार | जयपूर |
| सारनाथ स्तूप | औरंगाबाद |
| शांती निकेतन | अलाहाबाद |
| बुलंद दरवाजा | हैद्राबाद |
| अंबर राजवाडा | लखनौ |
| बिबीका मकबरा | पश्चिम बंगाल |

□

## ' टी ' पार्टी

पण शब्दांची ! ह्या साऱ्या दोन-अक्षरी शब्दांचे शेवटचे अक्षर आहे 'टी'. दिलेल्या अर्थाच्या अनुरोधाने पहिले अक्षर रिकाम्या जागेत भरून सांगता येतील हे शब्द ?

| | |
|---|---|
| रजा-- | ☐ टी |
| भाकर-- | ☐ टी |
| मुलगी— | ☐ टी |
| टोपली— | ☐ टी |
| मांजरी-- | ☐ टी |
| शीळ-- | ☐ टी |
| विलंब-- | ☐ टी |
| झोपडी-- | ☐ टी |
| सर्पण— | ☐ टी |
| नळ— | ☐ टी |
| लहान पेटारा-- | ☐ टी |
| स्त्री-कलावंत-- | ☐ टी |
| काळी टिकली-- | ☐ टी |
| संन्याशाचे वस्त्र-- | ☐ टी |
| लहान वाडगा— | ☐ टी |
| सुगंधी द्रव्याचा लेप — | ☐ टी |
| पापडाच्या पिठाची गोळीं-- | ☐ टी |
| औषधी वनस्पती-- | ☐ टी |
| सहाव्या दिवसाची तिथी-- | ☐ टी |
| अर्भकाचें आरोग्यवह मिश्रण-- | ☐ टी |

☐

## नद्यांच्या काठावर वसलेली शहरे

पुढे काही नद्या आणि त्यांच्या काठीं वसलेली शहरे यांची नावे विखरून दिली आहेत. पहा बरे तुम्हांला सांगता येते का कुठले शहर कुठल्या नदीच्या काठावर उभे राहिले आहे?

**नद्या**

| | | | |
|---|---|---|---|
| गोदावरी | कृष्णा | सतलज | यमुना |
| महानदी | झेलम | गंगा | सतलज |
| मैयानी | गंगा | हुगळी | गंगा यमुना सरस्वती |
| गंगा | तापी | गोमती | गंगा |

**शहरे**

| | | | |
|---|---|---|---|
| अलाहाबाद | लखनौ | पाटणा | कलकत्ता |
| नासिक | लुधियाना | विजयवाडा | वाराणसी |
| कटक | फेरोजपूर | श्रीनगर | दिल्ली |
| चितगाँग | हरद्वार | कानपूर | सुरत |

## गडीची आगगाडी

शब्दकोशाप्रमाणे ‘गडी’ हृया शब्दाचा अर्थ–मित्र, सोबती, किरकोळ नोकर, भिडू ( खेळात ), गड्डी, जुडी इ. इ. आता हृयाच ‘गडी’ शब्दामागे फक्त एकच अक्षर जोडून, पुढे दिलेल्या अर्थाचे शब्द, शोधून काढता येतील ?

| | | | |
|---|---|---|---|
| | ग | डी | –तराजू |
| | ग | डी | –पागोटे |
| | ग | डी | –हस्तभूषण |
| | ग | डी | –दगडाचे पात्र |
| | ग | डी | –दिखाऊ |
| | ग | डी | –टांग |
| | ग | डी | –विंचवाची नांगी |
| | ग | डी | –सवंगडी |
| | ग | डी | –स्त्रियांचा खास खेळ |
| | ग | डी | –खोलीकरिता दिलेला बेकायदेशीर पैसा |

| | | | |
|---|---|---|---|
| शेगडी– | | ग | डी |
| कांबळे– | | ग | डी |
| कर्णभूषण– | | ग | डी |
| एक झुडूप– | | ग | डी |
| दाट मैत्री– | | ग | डी |
| युक्ती– | | ग | डी |
| पात्रविशेष– | | ग | डी |
| वस्त्रहीन– | | ग | डी |
| मुलांचा खेळ– | | ग | डी |
| फाकलेल्या पायाची– | | ग | डी |

□

## कशी कराल ही वाटणी ?

एका शहरात एक सावकार राहत होता.
त्याला होती तीन मुले.
यथासमय सावकार मरण पावला.
आपल्या मृत्युपत्रात सावकाराने असे लिहिले होते की, मालमत्तेचा निम्मा भाग मोठ्या मुलाने घ्यावा; तिसरा भाग मधल्याने घ्यावा आणि नववा भाग धाकट्याने घ्यावा.
तिघांही भावांनी आपल्या पित्याच्या इच्छेप्रमाणे साऱ्या संपत्तीची वाटणी केली.
फक्त सतरा घोडे उरले.
हे सतरा घोडे काही त्यांना मृत्युपत्राप्रमाणे वाटून घेता येईनात.
कारण तसे केल्यास एक--दोन घोडे कापावे लागले असते !
म्हणून मग त्यांनी आपली ही अडचण त्यांच्या राजाकडे नेली.
पण राजालाही यातून मार्ग सुचेना.
राजाने हा प्रश्न आपल्या न्यायाधिशाकडे सोपवला.
न्यायाधिशाने सारी हकीकत नीट ऐकली.
घटकाभर त्यालाही त्या वाटणीने चमकावले.
तथापि तो त्या तिघां भावांना म्हणाला, ' ह्या सतरा घोड्यांची वाटणी मी रीतसर करू शकेन. पण मला एक सांगा की, तुमच्यापैकी प्रत्येकास, तुमच्या वाजवी हिश्श्यापेक्षा थोडा जास्त भाग मिळाला, तर चालेल की नाही ?'
साऱ्या भावांनी होकारार्थी माना डोलावल्या.
' ठीक आहे, ' न्यायाधीश म्हणाला. ' उद्या तुम्ही ते सतरा घोडे घेऊन या म्हणजे मी त्यांची मृत्युपत्रातल्याप्रमाणे वाटणी करून देईन. '
आणि खरोखरीच न्यायाधिशाने तशी वाटणी करून दिली.
कशी, ती सांगता येईल तुम्हांला ? □

# गणितातील गंमत–२

**प्रत्यक्ष करून पहाच—**

१ × ९ + २ = ११
१२ × ९ + ३ = १११
१२३ × ९ + ४ = ११११
१२३४ × ९ + ५ = १११११
१२३४५ × ९ + ६ = ११११११
१२३४५६ × ९ + ७ = १११११११
१२३४५६७ × ९ + ८ = ११११११११
१२३४५६७८ × ९ + ९ = १११११११११
१२३४५६७८९ × ९ + १० = ११११११११११

१ × ८ + १ = ९
१२ × ८ + २ = ९८
१२३ × ८ + ३ = ९८७
१२३४ × ८ + ४ = ९८७६
१२३४५ × ८ + ५ = ९८७६५
१२३४५६ × ८ + ६ = ९८७६५४
१२३४५६७ × ८ + ७ = ९८७६५४३
१२३४५६७८ × ८ + ८ = ९८७६५४३२
१२३४५६७८९ × ८ + ९ = ९८७६५४३२१

१२३४५६७८९
९८७६५४३२१
१२३४५६७८९
९८७६५४३२१
+२
―――――――――
२२२२२२२२२२

## म्हणून सततोद्योगी राहा

उद्योग उशाशी, देणे पायथ्याशी.
उद्योग करी श्रमाने, त्यास सर्व मिळे क्रमाने.
उद्योग हीच किमया बरी, धातुमात्राचे सोने करी.
उद्योगे पैसा वाढतो, बसून खाता खुंटतो.
उद्योगाचे घरी ऋद्धि-सिद्धी पाणी भरी.
उद्योगाचे अंती, द्रव्य, भूषण आणि कीर्ती.
उद्योगाचे घरी, ईश्वर साहाय्य करी.
उद्योगाचे घरी, सुखे येती सामोरी.
उद्योगाचे घरी, लक्ष्मी नांदे परोपरी.
उद्योग्याचे घरी, क्षुधा प्रवेश न करी.
उद्योग्याची सद्दी जोरावर, आळशाला मंदी जन्मभर.
उद्योग्याचे घर, सोडिती कोतवाल नाझर.
उद्योग्यास रिकामपण, वाटे ओझ्याप्रमाण.
उद्योगाने सुख, रिकामपणी दुःख.
उद्योगाने सर्व सोपे, आळसाने सर्व कठीण.
उद्योगाने मन स्वच्छ रहाते, आळसाने मन खाते.
उद्योगाचे निशाण भगवंताचे हाती, निर्बळाला रात्रंदिवस खंती.
उद्योगाची गुढ्या-तोरणे, आळसाची अधोवदने.

□

**श्रीगणेशायनमः— २**

रिकाम्या जागी योग्य ती अक्षरे भरून सांगा ही देवादिकांची नावे.

| | |
|---|---|
| गणपती | ☐ घ्न ☐ र्ता |
| सरस्वती | भा ☐ ती |
| | ☐ ग्दे ☐ ता |
| | वा ☐ ☐ री |
| | ☐ ग्व ल्ल ☐ |
| | ☐ स ☐ हि ☐ |
| ब्रह्मदेव | हं ☐ वा ☐ न |
| | ☐ धा ☐ |
| श्रीकृष्ण | ☐ मो द ☐ |
| | रं ☐ ☐ थ |
| | शौ ☐ |
| शंकर | ☐ हा का ☐ |
| | शू ☐ पा ☐ |
| | व्यो ☐ के ☐ |
| | ☐ क ☐ ध्व ☐ |
| | वृ ☐ भ ☐ ज |
| | श्री ☐ ठ |

☐

## ‘ भू ’ चे भगत

भू म्हणजे पृथ्वी. पण ह्याच ‘ भू ’ पुढे फक्त दोन अक्षरे ठेवली असता किती वेगळ्या अर्थाचे शब्द बनतात. पुढे दिलेल्या अर्थाच्या मदतीने, रिकाम्या जागी योग्य ती अक्षरे भरून ‘ भू ’ने सुरुवात झालेले हे सारे तीन–अक्षरी शब्द शोधून काढा पाहू.

भू ☐ ☐ – धरणीकंप
भू ☐ ☐ — नटाचा वेश
भू ☐ ☐ — जमीन-दान
भू ☐ ☐ — पृथ्वीचा पृष्ठभाग
भू ☐ ☐ — जमिनीची मापणी
भू ☐ ☐ — प्राणिमात्रांचा आत्मा
भू ☐ ☐ — जमीनदाराचा नोकर
भू ☐ ☐ — जमिनीवर फिरणारे
भू ☐ ☐ — गावचा पाटील
भू ☐ ☐ — भूवर्णन
भू ☐ ☐ — भूतबळी
भू ☐ ☐ — ब्राह्मण
भू ☐ ☐ — पर्वत
भू ☐ ☐ — राजा
भू ☐ ☐ — इहलोक
भू ☐ ☐ — शेतकरी
भू ☐ ☐ — वृक्ष
भू ☐ ☐ — अलंकार
भू ☐ ☐ — पृथ्वीच्या पोटातील आग
भू ☐ ☐ — जमिनीचे समुद्रात गेलेले टोक

## ‘ देव ’ची देवघेव

–अर्थाच्या अनुरोधाने गाळलेल्या जागी योग्य अक्षरे भरून–

| | | |
|---|---|---|
| दे व □ | — | देव |
| दे व □ | — | देवाने केलेली |
| दे व □ | — | देवाला अर्पण केलेली वस्तू |
| दे व □ | — | लग्न-मुंजीप्रीत्यर्थ स्थापलेली देवता |
| दे व □ | — | चौकी |
| दे व □ | — | कोनाडा |
| दे व □ | — | देवाचे तेज |
| दे व □ | — | बोरू |
| दे व □ | — | देवाचे सेवेकरी |
| दे व □ | — | आकाशवाणी |
| दे व □ | — | स्वर्ग |
| दे व □ | — | कल्पतरू |
| दे व □ | — | मांत्रिक |
| दे व □ | — | देण्याघेण्याचा व्यवहार |
| दे व □ | — | देवापुढे नाचणारी स्त्री |
| दे व ▭ | — | देवाच्या मूर्तीची स्थापना |
| दे व ▭ | — | निरूपद्रवी माणूस |
| दे व ▭ | — | साधूंच्या नादी लागणे |
| दे व ▭ □ | — | तोफा--बंदुकांचा भडिमार |
| दे व ▭ □ | — | देवपूजा |

□

## सांगा पाहू हे पहिले पहिल्यांदा

१. भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले राष्ट्रपती.

२. भारतातील घटक राज्याची पहिली स्त्री-मुख्यमंत्री.

३. स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल.

४. स्वतंत्र भारताचे पहिले भारतीय गव्हर्नर जनरल.

५. काँग्रेसची पहिली स्त्री-अध्यक्षा.

६ राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अध्यक्ष.

७. भारतीय प्रजासत्ताकाचे पहिले पंतप्रधान.

८. भूदलाचा पहिला भारतीय प्रमुख.

९. वायुदलाचा पहिला भारतीय प्रमुख.

१०. नौदलाचा पहिला भारतीय प्रमुख.

११. नोबेल पारितोषिकाचा पहिला भारतीय मानकरी.

१२. आय. सी. एस्.च्या परीक्षेला बसणारा पहिला भारतीय.

१३. संयुक्त राष्ट्र संघटनेतील 'सर्व साधारण सभे'च्या पहिल्या स्त्री-अध्यक्षा.

१४. जागतिक बिलियर्डसाठी ठेवलेली ढाल जिंकणारा पहिला भारतीय.

१५. माऊंट एव्हरेस्टवर चढणारा पहिला भारतीय वीर.

१६. इंग्लिश खाडी पोहून जाणारा पहिला भारतीय पुरुष.

१७. इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय महिला.

□

## ओळखा पाहू राजधान्या !

पुढे दिलेल्या दोन विभागांपैकी पहिल्यात आपल्या देशातील सोळा राज्यांची नावे दिली आहेत, तर दुसऱ्यात त्यांच्या राजधान्या. येईल तुम्हांला योग्य सांगड घालता या दोन विभागांची ?

पहिला विभाग | दुसरा विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| आसाम | राजस्थान | भोपाळ | कलकत्ता |
| बिहार | महाराष्ट्र | पाटणा | जयपूर |
| गुजरात | आंध्र प्रदेश | कोहिमा | चंदीगड |
| केरळ | उत्तर प्रदेश | मुंबई | श्रीनगर |
| कर्नाटक | मध्य प्रदेश | मद्रास | त्रिवेंद्रम |
| तामीळनाडू | नागा प्रदेश | शिलाँग | बंगलोर |
| ओरिसा | पश्चिम बंगाल | लखनौ | भुवनेश्वर |
| पंजाब | जम्मू-काश्मीर | हैद्राबाद | गांधीनगर |

## चालवा बुध्दी

विधाने आणि शोधावयाचे शब्द ह्यांतील रिकाम्या जागा यांच्या साहाय्याने येतील तुम्हांला हे शब्द शोधून काढता ?

**विधाने**

| | |
|---|---|
| १. किरकोळ, सुट्टे | प □ चु □ ण |
| २. कोमट | स □ ग □ म |
| ३. ठराविक मंत्रजप | पु □ श्च □ ण |
| ४. धमकावणी | द □ डा □ णी |
| ५. ऐन तारुण्य | भ □ न □ ती |
| ६. देवांगना | सु □ यु □ ती |
| ७. फजिती | हु □ रे □ डी |
| ८. सूर्योदयापासून सूर्यास्ता-पर्यंतचा काळ | सौ □ दि □ स |
| ९. पोकळ, असंबद्ध बडबड | भा □ ड □ था |
| १०. निर्ढावलेला | नि □ र □ ट |
| ११. मोठ्या समुद्रात हिंडणारी | सा □ र □ मी |
| १२. परमेश्वर | न □ ना □ की |
| १३. कुंपण घालणे | बां □ बं □ स्ती |
| १४. जिकडे-तिकडे | स □ रा □ री |
| १५. पुनर्जन्म | न □ जी □ न |
| १६. दासी | प □ चा □ का |
| १७ उत्कर्ष, विपुलता | फ □ फ □ ट |
| १८. रुक्ष | र □ र □ ट |
| १९. आईबाप | मा □ पि □ रे |
| २०. वाईट वर्तनाचा | दु □ च □ णी |

## निवडा हे शब्द–१

दिलेल्या दोन शब्दांपैकी एकाची निवड करून सांगा ह्या शब्दांचे अर्थ.

१. नटवर—नटण्याची हौस असलेला/परमेश्वर
२. देववाणी—आकाशवाणी/देवांची भाषा
३. निर्व्याज—बिनव्याजाने/निष्कपट
४. परायण—वारंवार वाचणे/तत्पर
५. सूक्ष्मबुद्धी—मूर्ख/अति बुद्धिमान
६. लवणशाक—लोणचे/मिठाची भाजी
७. व्रजांगना—कठोर स्त्री/गवळण
८. राजराणी—पट्टराणी/राजाची राणी
९. मसी—मला/शाई
१० धनगाडा—श्रीमंत/पैशाची गाडी
११. भंडावा—फजिती/भांडण
१२. बसकर—पुरे कर/आसन
१३. फुलपात्र—फुलदाणी/रामपात्र
१४. पस्ताव—सूचना/पश्चात्ताप

□

## तुमचे सामान्यज्ञान–१

१ 'आशिया' शब्दाचा अर्थ काय ?
२. एखाद्या राष्ट्राची सत्ता समुद्रावर कुठपर्यंत चालते ?

३. हिंदुस्थानला यायचा जलमार्ग कुणी शोधून काढला ?

४. जपानच्या राजाला काय म्हणतात ?

५. पृथ्वीपासून चंद्र किती दूर आहे ?

६. शिरगणती किती वर्षांनी करतात ?

७. ' रोबो ' म्हणजे काय ?

८. मानवाचे पहिले हत्यार कोणते !

९. घड्याळ जास्तींत जास्त किती पुढे अथवा मागे जाऊ शकते ?

१०. शुद्ध सोने किती कॅरटचे ?

११. टपालाच्या तिकिटावर स्वत:चे नाव न छापणारा देश कोणता ?

१२. भारतात रेल्वे-इंजिनांचा कारखाना कुठे आहे ?

१३. टेलिफोन तयार करणारा भारतीय कारखाना कुठे आहे?

१४. जगातले तीन मोठे महासागर कोणते ?

१५. उत्तर ध्रुवावर दिवस किती काळ टिकतो ?

१६. हिंदुस्थानातील सर्वांत लांब नदी ?

१७. विषुववृत्ताचे अक्षांश किती ?

१८. सर्वांत उंच पक्षी कोणता ?

१९. जगातला एक महान शोध लावणाऱ्या स्त्रीचे नाव काय? कसला शोध लावला ?

## शरीरावयवी वाक्प्रचार–१

पुढील दोन विभागांतील विखरून दिलेले शरीरावयवी वाक्प्रचार आणि त्यांचे अर्थ ह्यांची सांगड घालता येईल तुम्हांला ?

| | |
|---|---|
| १ कंठी प्राण धरणे | वचनात अडकवणे |
| २ कपाळ काढणे | थोबाडीत मारणे |
| ३ कंबर बांधणे | अनियंत्रित बोलणे |
| ४ कान लांब होणे | नावलौकिकास चढणे |
| ५ गळा गोवणे | कामात कुचरपणा करणे |
| ६ गाल रंगविणे | पोट भरणे |
| ७ जीभ पाघळणे | वैभवास चढणे |
| ८ डोके उचलणे | विश्वासघात करणे |
| ९ डोळा ओळखणे | तुच्छता दर्शविणे |
| १० तोंड घालणे | पूर्णपणे उपभोग घेणे |
| ११ नाक जळणे | अक्कल कमी होणे |
| १२ पाठ चोरणे | दुर्गंधी असह्य होणे |
| १३ पाय पसरणे | मध्येच बोलणे |
| १४ पोट जाळणे | कल जाणणे |
| १५ मान कापणे | कार्याला सिद्ध होणे |
| १६ हात ओवाळणे | विशिष्ट हेतूने जिवंत राहणे |

## सारे काही प्राण्यासंबंधी

आपल्या जंगली जीवनात हत्ती कित्येक महिने बसत नाही. एखाद्या मोठ्या झाडाच्या आधाराने तो उभ्या उभ्या झोप घेतो.

+ + +

सर्व प्राण्यांत जिराफ हा एक असा प्राणी आहे की, तो कुठल्याही प्रकारचा आवाज काढत नाही. याचे कारण असे सांगण्यात येते की, जिराफाला स्वरयंत्रच नाही.

+ + +

ससा हा जन्मत:च आंधळा, बहिरा आणि 'नुसता गोळा' असतो. दहा दिवसांनंतर ह्या साऱ्या गोष्टी त्याला प्राप्त होतात. शिवाय त्याचे आयुष्यही सर्व प्राण्यांत कमी–फक्त पाच वर्षांचे–असते.

+ + +

जगात तीन हजार प्रकारच्या माशा आढळतात.

+ + +

मोठ्या अजगराचे वजन जवळजवळ तीन मणांपर्यंत असते.

+ + +

हत्ती, जिराफ, गोरिला, गेंडा वगैरे 'मोठे' प्राणी शाकाहारीच आहेत.

+ + +

केवळ सरडाच रंग बदलतो; त्याची मादी नाही.

+ + +

कस्तुरी-मृगाच्या मादीला शिंगेही नसतात आणि दातही नसतात.

+ + +

जंगली जनावरांचा सर्वांत मोठा वैरी म्हणजे जंगली कुत्रा. □

**सारे काही माणसासंबंधी**

माणसाला डोळे मिटून सरळ चालता येत नाही.

+ + +

मानवाचा ‘ प्राण’च असलेल्या हृदयाचे वजन सर्व शरीराच्या फक्त ०.४० टक्केच असते.

+ + +

मानवाच्या तोंडून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द उच्चारायला निरनिराळ्या ७२ स्नायूंची मदत लागते.

+ + +

मानवाच्या केसाची जाडी ०.००५ मिलिमीटरपासून ते ०.६ मिलिमीटरपर्यंत असते.

+ + +

सात वर्षांत मानवी शरीर पार बदलून, रक्ताचा एकही जुना थेंब शरीरात शिल्लक राहत नाही.

+ + +

हसताना माणसाला आपल्या १३ स्नायूंची मदत घ्यावी लागते, तर रागाच्या वेळी ५० स्नायूंना काम पडते.

+ + +

सर्वसाधारण मानवाच्या शरीरातील रक्त चोवीस तासांत जवळजवळ १००,००० मैल प्रवास करते. आराम करत असताना ह्या रक्ताचा वेग एवढा वाढलेला असतो की, पायाच्या अंगठ्यापासून ते हृदयापर्यंत आणि तिथून परत मूळ जागी यायला रक्ताला फक्त एक मिनिट लागते.

+ + +

चोवीस तासांत मानव सर्वसाधारणपणे २३,२४० वेळा श्वासोच्छ्वास करतो. ह्याच कालावधीत वीस घनफूट एवढा प्राणवायू आपण आत घेत असतो. उभे असताना मिनिटाला दोन गॅलन, चालताना चार गॅलन आणि धावताना आठ गॅलन हवा आपण शरीरात घेत असतो.

□

## इंग्रजी–मराठी

पुढे काही इंग्रजी अक्षरे दिली आहेत. त्यांच्या उच्चाराने सुरू होणारे दोन–अक्षरीच शब्द, अपेक्षित अर्थावरून, उरलेले हवे असलेले मराठी अक्षर शोधून काढून, सांगू शकाल ? पहिला शब्द सोडवून दिला आहे.

| | | |
|---|---|---|
| A | क | १ ही संख्या |
| A | | बैलाचा छकडा |
| B | | ओतीव लोखंड |
| B | | द्वितीया |
| C | | हद्द |
| C | | प्रामाणिक |
| D | | गोंद |
| E | | धनी |
| E | | मुसलमानी सण |
| E | | येशू ख्रिस्त |
| G | | प्राणी |
| G | | खोगीर |
| I | | मोफत |
| I | | आरसा |
| K | | कोणत्या काळी |

| | | |
|---|---|---|
| K | | मोराचा ध्वनी |
| O | | प्रवाह |
| O | | कल |
| O | | निर्जन |
| O | | चबुतरा |
| P | | ताठा |
| P | | आसन |
| P | | दुःख |
| P | | थुंकी |
| T | | टिचकी |
| T | | गुणदोष–विवेचन |
| T | | शब्दार्थाचे स्पष्टीकरण |
| Y | | तलम वस्त्र |
| Y | | वाण |
| Y | | मुदतविषयक करार |

□

## व्हा संशोधक

पुढे एका बाजूला संशोधकांची नावे दिली आहेत, तर दुसऱ्या बाजूला त्यांनी शोधून काढलेल्या वस्तू. येईल तुम्हांला ह्या दोहोंची योग्य ती सांगड घालता ?

| संशोधक | |
|---|---|
| डाईमलर | बर्लिनर |
| मॅकमिलन | होवे |
| स्टीफन्सन | बुशनेल |
| वॉटरमन | शॉक्ले |
| बेक्वेट | शोल्स |
| एडिसन | बायर्ड |
| कुक्रेल | टॉरिसेली |
| जेम्स वॅट | राईट बंधू |

| संशोधने | |
|---|---|
| वाफेचे इंजीन | सब-मरीन |
| हॉवर-क्राफ्ट | ट्रान्झिस्टर |
| फोनोग्राफ | टाईपरायटर |
| हेलिकॉप्टर | मायक्रोफोन |
| फाऊंटन पेन | शिवणयंत्र |
| रेल्वे-इंजीन | बॅरॉमिटर |
| सायकल | विमान |
| मोटार | टेलिव्हिजन |

□

## ओळखा ह्या उपमा

पुढे दिलेल्या सांप्रदायिक उपमांत फक्त उपमान दिलेले नाही. ते किती अक्षरांचे आहे, ते रिकाम्या चौकोनावरून समजून येईल. शोधा ह्या उपमा.

□ □ — सारखा लाल
□ □ — सारखा पांढरा–फटक
□ □ — सारखा बळकट ( शरीर )
□ □ — सारखे गार अंग
□ □ — सारखा चरणारा ( माणूस )
□ □ — सारखा कडू
□ □ — सारखा दात धरणारा
□ □ — सारखा पीळदार
□ □ □ — सारखी लोचट ( पोळी )
□ □ □ — सारखे पांढरे स्वच्छ (तूप)
□ □ □ — सारखा काळा
□ □ □ — सारखा दीर्घद्वेषी
□ □ □ — सारखा दडदडीत
□ □ □ — सारखी सुंदर ( मुलगी )
□ □ □ — सारखी मऊ ( पोळी )
□ □ □ — सारखा गोड बोलणारा
□ □ □ □ -- सारखा रागीट
□ □ □ □ — सारखा बिलगणारा
□ □ □ □ □ — सारखा लाजणारा

□

## शब्दपट

या कोड्याचे उभे-आडवे शब्द सारखेच वाचले जायला हवेत- दिलेल्या विधानांचा उपयोग करून.

| | | |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| ४ | | |
| ५ | | |

<u>विधाने</u>— १ उभा - आडवा—नार नाही असा.
२ उभा - ४ आडवा—पास नाही असा.
३ उभा - ५ आडवा—रस नाही असा.

पुढील चौकोनांतील सोळा अक्षरेच रिकाम्या चौकोनात वापरून चार, सहा-अक्षरी शब्द शोधून काढता येतील? ह्या शब्दांचे अर्थ खाली दिले आहेत आणि त्यांची पहिली व शेवटची अक्षरे अगोदरच आकृतीत भरलेली आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ का | | | | | २ न |
| | सं | थ | ज | न | |
| | टू | र | टू | न | |
| | खा | ग | दी | नी | |
| | मा | वा | र्ज | डा | |
| ३ स | | | | | न |

<u>आडवे शब्द</u> — १ - अशक्त माणूस, ३ - झाडलोट

<u>उभे शब्द</u> — १ - मुनीम, २ - दिमाखाने

## तुमचे सामान्यज्ञान–२

१. जगातले सर्वांत मोठे मंदिर कोणते ?
२. शरीरात रक्त काय वेगाने वाहते ?
३. मलेरियाची साथ पसरवणाऱ्या डासाचे नाव काय ?
४. ' प्रवदा ' काय आहे ?
५. सूर्यापासून पृथ्वी किती दूर आहे ?
६. सात महासमुद्र कुठले ?
७. वर्षातील कुठल्या ऋतूत सूर्य पृथ्वीच्या जास्तींत जास्त जवळ असतो ?
८. उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव यांच्यांत अधिक थंडी कुणावर असते ?
९. जगातला सर्वांत उंच प्राणी कुठला ?
१०. सूर्य उगवतो आणि मावळतो, हे खरे का ?
११. अधिक वेग कुणाचा—प्रकाशाचा, की आवाजाचा ?
१२. सगळ्यांत कठीण ' दगड ' कोणता ?
१३. कोपर्निकस कोण होता ?
१४. पहिले इंजीन कुणी तयार केले ?
१५. पृथ्वीवर, त्याचप्रमाणे पाण्यातही, सर्वांत मोठा प्राणी कोण?
१६. हत्ती सोंडेने पाणी पितो ?
१७. पृथ्वीला किती ग्रह आहेत ?
१८. भारतात रासायनिक खताचा कारखाना कुठे आहे ?
१९. कुठल्या देशाची राजधानी दरवर्षी बदलण्यात येई ?
२०. ' एस्परांटो ' म्हणजे काय ?

□


## शरीरावयवी वाक्प्रचार–२

पुढे दोन विभागांत विखरून दिलेले शरीरावयवी वाक्प्रचार आणि त्यांचे अर्थ ह्यांची योग्य सांगड घालता येईल तुम्हांला ?

| | |
|---|---|
| १ कंठी प्राण उरणे | वरचढ असणे |
| २ कपाळ चढणे | पळून जाणे |
| ३ कंबर बसणे | विस्तार करणे |
| ४ कान झाडणे | चरितार्थाचे साधन गमावणे |
| ५ गळा गुंतणे | हीन स्थितीतून वैभवाला येणे |
| ६ गाल फुगवणे | लाच देणे |
| ७ जीभ सोकवणे | उपद्रव होणे |
| ८ डोळे हालवणे | आसन्नमरण होणे |
| ९ डोळा चुकवणे | निराश होणे |
| १० तोंड पाघळणे | विनंती अमान्य करणे |
| ११ नाक वर असणे | पेचात सापडणे |
| १२ पाठ दाखवणे | शेखी मिरवणे |
| १३ पाय फोडणे | खाण्यास उत्सुक असणे |
| १४ पोट बुडणे | संमती देणे |
| १५ मान वर करणे | दृष्टीस न पडणे |
| २६ हात चेपणे | गुप्त गोष्ट बाहेर पडू देणे |

## शब्दपट

हृया कोडयाचे उभे आडवे शब्द सारखेच वाचले जायला हवेत—दिलेल्या विधानांच्या मदतीने योग्य अक्षरे भरून—




विधाने १. 'जन्म' मधील पहिला अर्धा भाग
२ तलवार श्रेष्ठ की—
३. शुद्ध शहरींना क्वचितच येणारी कला
४. मानवी आयुष्यातील दोन टोकांपैकी एक
५. 'बाण' मधला उजवीकडील अर्धा भाग


## शब्दसोपान

पुढे दिलेल्या आकृतीतील अक्षरांच्या मदतीने आणि खाली दिलेल्या विधानांच्या अनुरोधाने रिकाम्या खणांतून अक्षरे भरून, हवे असलेले योग्य शब्द शोधून काढा पाहू.

### विधाने

१. कर देणारा, २. ठेच, ३. वागणूक, ४. सुसर, ५. तळहात. ६. अग्नी, ७. घट्ट बांधल्याचा वण, ८. इंग्रज, ९. मनोरंजन, १०. चंद्र, ११. पाणिग्रहण, १२. सूर्य, १३. क्रूर माणूस,

१४. सांगितलेले काम न करणारा आणि न सांगितलेले काम करणारा. १५. कमंडलू



## सांगा पाहू

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ट | क | ळ | पं | च | वि | शी |

हचा आठ--अक्षरी शब्दाचा अर्थ आहे—तर्क, अनुमान. हचा शब्दातील प्रत्येक अक्षराचा उपयोग करून एक-.अक्षरी, दोन--अक्षरी, आणि तीन--अक्षरी असे किती शब्द तुम्हांला तयार करता येतात, पाहा बरे. आमच्या अंदाजाप्रमाणे निदान तीस शब्द तरी मिळतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| खो | गो | ठो | डो | हो | वो |

हे काही खोकला घालवणाऱ्या औषधाचे नाव नाही किंवा जगाच्या पाठीवरील कुठल्या एखाद्या भाषेतील हा शब्द नाही.

मराठीतीलच काही अक्षरे निवडून ती अशी एकापुढे एक ठेवली आहेत. पण हा शब्द असा घेडगुजरी वाटत असला, तरी त्याच्या प्रत्येक अक्षराला एक निश्चित अर्थ आहे.

सांगता येईल तुम्हांला हा अर्थ—प्रत्येक अक्षराचा अर्थ ? ☐

## शब्दांशी झटापट

पुढे दिलेले विभाग नीट पाहा आणि साऱ्या सूचना योग्य रीतीने पाळून नेमका शब्द शोधून काढा.

उदा. 'वचनभाक' हा पहिला शब्द घेऊ. तक्त्यात दाखविल्याप्रमाणे त्यातली दोन अक्षरे अशा रीतीने गाळावयाची आहेत, की उरलेल्या अक्षरांची योग्य ती जुळणी केल्यावर आपल्याला 'काव्य' हचा अर्थाचा शब्द मिळावा.

'वचनभाक' हा पाच--अक्षरी शब्द नीट पाहिला असता असे दिसेल की, त्यातील 'च' व 'भा' ही अक्षरे गाळल्यावर, उरलेल्या अक्षरांची ( व न क ) उलटापालट केल्यावर 'कवन' हा 'काव्य' ह्या अर्थाचा शब्द मिळतो.

अशाच रीतींने बाकीचे सारे शब्द शोधा पाहू.

| दिलेला शब्द | गाळावयाची अक्षरे | ह्या अर्थाचा शब्द | शोधलेला शब्द |
|---|---|---|---|
| वचनभाक | दोन | काव्य | ______ |
| लटपटीत | दोन | पडदा | ______ |
| वतनवाडी | दोन | पतंग | ______ |
| मंदवासर | दोन | उत्तराधिकारी | ______ |
| मनमोहन | दोन | वंदन | ______ |
| रत्नपारखी | तीन | गोड पदार्थ | ______ |
| शिरसावंद्य | तीन | मथितार्थ | ______ |
| सामीलनामा | तीन | उत्तम | ______ |
| शितळचंद | तीन | सैन्य | ______ |
| वाणजिन्नस | तीन | आनंदाचा काळ | ______ |
| लठ्ठंभारती | तीन | कपाळ | ______ |
| पाणउतारा | तीन | वरचढपणा | ______ |
| मातापितरे | तीन | पर्वा | ______ |
| राजीवनयना | चार | अन्न | ______ |
| वस्त्रप्रावरण | चार | आवाज | ______ |



□

## सारेच माणसाचा अवतार !

| | |
|---|---|
| अकलेचा खंदक | —मूर्ख, बिनअकली माणूस |
| उंटावरचा शहाणा | —मूर्खपणाची सल्ला-मसलत देणारा |
| अडणीवरचा शंख | —उच्चपदस्थ मूर्ख |
| सांबाच्या पिंडीवरचा विंचू | —मोठ्यांच्या आश्रयाने राहिलेला नीच |
| बगलबच्चा | —वशिल्याचा माणूस |
| गाजरपारखी | —मूर्ख |
| गाढवाचा खरारा | —बिनअकली मूर्ख |
| ऋणाईतस्वरूपी | —निरुपयोगी, पण उपद्रवी व्यक्ती |
| अलबत्या गलबत्या | —बिनकिमतीचा माणूस |
| कळीचा नारद | —कलागती लावणारा |
| गळग्रह | —डोईजड माणूस |
| गाळीव मूर्ती | —अति दुर्गुणी |
| बोकेसंन्यासी | —संभावित, कपटी |
| जडभरत | —आळशी, सुस्त |
| कळसूत्री बाहुले | —स्वाभिमान सोडून दुसऱ्याच्या तंत्राने वागणारा |
| खुशालचंद | —विनाकाळजी सुखविलासी |
| चंदुलाल | —चैनी, उधळचा |
| मेषपात्र | —बावळट |
| वेडा पीर | —छांदिष्ट |

□

## प्राण्यांवरून आलेले शब्द

आटोपशीरपणे आणि जोरदार रीतीने अर्थ व्यक्त करणारे काही शब्द पुढे पहिल्या विभागात दिले आहेत, तर त्यांचे अर्थ दुसऱ्या विभागात. सांगता येतील तुम्हाला ह्या शब्दांचे अर्थ ?

**विभाग पहिला :**

१. कपी, २. काकरव, ३. कोल्हेकुई, ४. ससेमिरा, ५. उंटाचे पिल्लू, ६. गद्धेमल्हार, ७. ग्रामकेसरी, ८. बोके–संन्यासी, ९. अल्लाची गाय, १०. सशाची अंधेरी, ११. गाईचे यजमान, १२. माकडाची जखम, १३. गुळावरच्या माशा, १४. घोड्याएवढी चूक, १५. माशाने गिळलेले माणिक.

**विभाग दुसरा :**

१. गरीब, निरुपद्रवी माणूस, २. संभावितपणाच्या नावाखाली कपटी विचार झाकणारा, ३, बाहेरून धैर्य दाखवणारा, पण अंतर्यामी भित्रा, ४. कर्णकटू गायन किंवा कर्कश भाषण, ५. प्रथम प्रिय, पण नंतर त्रासदायक होणारी वस्तू, ६ वेड लावण्याइतकी चिंता किंवा ध्यास, ७. हलकटांनी एखाद्याविरुद्ध केलेली व्यर्थ ओरड, ८. निंदकांनी केलेली निंदा, ९. एखाद्या मंडळीतील अत्यंत जुना माणूस, १०. एखाद्याने गिळंकृत केलेली वस्तू परत न येणे, ११. फार मोठी, अक्षम्य चूक, १२. वैभवकाली धरून असणारे, पण विपत्काली सोडून जाणारे लोक, १३. अनेक लोक मध्ये पडल्याने विचका झालेले काम, १४. मूर्ख, बेअकली माणूस, १५. मूर्खपणाची डोळेझाक.

□

## निवडा हे शब्द–२

दिलेल्या दोन अर्थांपैकी एकाची निवड करून सांगता येतील तुम्हांला पुढील शब्दांचे नेमके अर्थ ?

| शब्द | अर्थ |
|---|---|
| १. उभे पळणे – | न थांबता एकसारखे पळणे / एकाच जागी उभे राहून पळत राहणे |
| २. खऱ्याचे खांड – | नेहमी सत्य बोलणारा / नेहमी असत्य बोलणारा |
| ३. तिमाजी नाईक – | एक लढवय्या / कवडीचुंबक |
| ४. काळजीचा धगड – | अतिशय काळजी करणारा / अत्यंत बेफिकीर |
| ५. जागती निद्रा – | सावध झोप / जागेपणी घेतलेली झोप |
| ६. पिकले झाड – | म्हातारा माणूस / श्रीमंत, उदार माणूस |
| ७. चालत्या पायी – | न थांबता / पायी चालत |
| ८. हस्तसंकोच – | हस्तांदोलन / कृपणता |
| ९. चांभारचतुराई – | चतुर कारागीर / नसती उठाठेव |
| १०. अंधळयाचा रस्ता – | काळोखाचा रस्ता / सरळ, रुंद मोकळा रस्ता |

[ पुढल्या पानावर चालू ]

## निवडा हे शब्द–२ [ पुढे चालू ]

११. कक्षाधीश – जाडजड माणूस / अत्यंत दरिद्री माणूस

१२. जमीनदारी मत – मोठ्या माणसाचे मत / आपमतलबी मत

☐

## ‘ पर ’ची परंपरा

दिलेल्या अर्थाच्या मदतीने आणि अपेक्षिल्याप्रमाणे, ‘ पर ’ ह्या शब्दापुढे, एक आणि दोन अक्षरे जोडून, नवीन शब्द तयार करता येतील तुम्हाला ?

१. पर☐ – करंडी
२. पर☐ – अन्यत्र
३. पर☐ – काळजी
४. पर☐ – अत्युच्च
५. पर☐ – कुऱ्हाड
६. पर☐ – अनोळखी
७. पर☐ – उपरती
८. पर☐ – पलिकडील
९. पर☐ – दुसऱ्याचे धन
१०. पर☐ – तराजूचे पारडे

११. तट – पर☐☐
१२. मोक्ष – पर☐☐
१३. दुर्दशा – पर☐☐
१४. उजळणी – पर☐☐
१५. परस्पर – पर☐☐
१६. नवलाई – पर☐☐
१७. शत्रूची स्वारी – पर☐☐
१८. परवानगी – पर☐☐
१९. दुसऱ्या देशाचा – पर☐☐
२०. अतिसूक्ष्म अंश – पर☐☐

☐

## सामाजिक चळवळींचे पुढारी

पुढे दिलेल्या आकृतीत सामाजिक चळवळी व त्यांच्या जनकांची नावे विखरून दिली आहेत. त्यांची योग्य अशी जुळणी करता येईल तुम्हांला ?

| सामाजिक चळवळी | | त्यांचे जनक | |
|---|---|---|---|
| १ | ब्राह्मो समाज | विनोबा भावे | १ |
| २ | आर्य समाज | धोंडो केशव कर्वे | २ |
| ३ | रामकृष्ण मिशन | श्रीमती ब्लॅव्हॅट्स्की | ३ |
| ४ | सर्व्हंट्स ऑफ इं. सोसायटी | हेन्री डूरांट | ४ |
| ५ | सोशल सर्व्हिस लीग | बेडन पॉवेल | ५ |
| ६ | भारत सेवक समाज | ना. म. जोशी | ६ |
| ७ | भूदान चळवळ | महात्मा गांधी | ७ |
| ८ | विधवांसाठी आश्रम | गोपाळ कृष्ण गोखले | ८ |
| ९ | हरिजनांसाठी चळवळ | जवाहरलाल नेहरू | ९ |
| १० | थिऑसॉफिकल सोसायटी | स्वामी विवेकानंद | १० |
| ११ | बॉय-स्काऊट | स्वामी दयानंद | ११ |
| १२ | रेड-क्रॉस | राजा राममोहन राय | १२ |

□

## नेत्यांची ‘ लाडकी ’ नावे

आपल्या आवडत्या पुढाऱ्यांना जनता नाना नावांनी संबोधते. उदा. नेहरूंना ती ओळखते चाचा म्हणून, तर गांधीजींना राष्ट्रपिता. पुढे दिलेल्या चौकोनातील अक्षरांच्या मदतीने आठ भारतीय नेत्यांची, वर उल्लेखिल्यासारखी–वाटल्यास त्यांना पदव्या म्हणा–टोपणनावे जुळवायची आहेत. शोधून काढता येतील तुम्हाला ही नावे ? अक्षराचा उपयोग केल्यावर त्याच्यावर काट मारा.

| | | | |
|---|---|---|---|
| गु | गु | जी | जी |
| दे | दे | पं | बं |
| रु | रु | तं | धु |
| पू | स्वा | न्य | त्र्य |
| ने | के | लो | वी |
| री | जा | बा | व |
| श | ब | क | र |
| स | ता | मा | ? |

आता ह्या साऱ्यांची मूळ नावे सांगा पाहू. ह्या आठ पुढाऱ्यां-पैकी सात राजकीय आहेत, तर आठवा साहित्यिक.

□

## देश आणि राजधान्या–१

पुढे दिलेल्या पहिल्या विभागात जगातील काही देश दिले आहेत, तर दुसऱ्या विभागात त्यांच्या राजधान्या. सांगता येईल तुम्हाला कुठल्या देशाची राजधानी कुठली ते ?

पहिला विभाग :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ भारत | २ अफगाणिस्तान | ३ बांगला देश | ४ सिलोन | ५ जपान |
| ६ ऑस्ट्रिया | ७ इराक | ८ इटली | ९ पाकिस्तान | १० कॅनडा |
| ११ चीन | १२ बर्मा | १३ ऑस्ट्रेलिया | १४ क्यूबा | १५ इराण |
| १६ फरान्स | १७ स्वीडन | १८ हंगेरी | १९ बेल्जम | २० केनया |
| २१ डेन्मार्क | २२ स्वित्झर्लंड | २३ अर्जेंटिना | २४ इंडोनेशिया | २५ पू. जर्मनी |
| २६ स्पेन | २७ प. जर्मनी | २८ द. आफ्रिका | २९ झेकोस्लोव्हाकिया | ३० ग्रीस |

दुसरा विभाग :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इस्लामाबाद | ब्यूनोस आयर्स | जकार्ता | बर्लीन | बर्न |
| नैरोबी | केप टाऊन | प्राग | अथेन्स | बॉन |
| स्टॉकहोम | कोपनहेगन | ब्युडापेस्ट | माद्रीद | ब्रुसेल्स |
| बगदाद | रंगून | व्हीएन्ना | हवाना | तेहरान |
| टोकियो | रोम | पेकिंग | ओटावा | पॅरीस |
| काबूल | कॅनबरा | डाक्का | कोलंबो | नवी दिल्ली |

## देश आणि राजधान्या–२

पुढे दिलेले देश आणि त्यांच्या राजधान्या ह्यांची सांगड घालता येईल तुम्हाला ?

| देश | राजधान्या | राजधान्या | देश |
|---|---|---|---|
| १ इस्रायल | लिस्बन | बेलग्रेड | १३ यू. ए. आर्. |
| २ आयर्लंड | बैरूत | वॉशिंग्टन डी. सी. | १४ पोलंड |
| ३ थायलंड | वेलिंग्टन | दार-एस-लाम | १५ नॉर्वे |
| ४ टर्की | दमास्कस | मनीला | १६ फोर्मोसा |
| ५ यू.एस्.एस्.आर्. | लंडन | आदिसअबाबा | १७ युगांडा |
| ६ जॉर्डन | काठमांडू | कैरो | १८ द. व्हिएतनाम |
| ७ पोर्तुगाल | तेल अवीव | वॉरसा | १९ उ. व्हिएतनाम |
| ८ लेबॅनॉन | डब्लीन | ओस्लो | २० युगोस्लाव्हिया |
| ९ न्यूझीलंड | बँकॉक | तायपेथ | २१ यू. एस्. ए. |
| १० सीरिया | अंकारा | कंपाला | २२ तांझानिया |
| ११ यू. के. | मॉस्को | सायगॉन | २३ फिलिपाईन्स |
| १२ नेपाळ | अम्मान | हनोई | २४ इथिओपिआ |

## थोर देशसेवक

पुढील आकृतीत दिसत असलेल्या अक्षरांत आपल्या देशातील बारा पुढाऱ्यांची आडनावे लपली आहेत. ह्या अक्षरांची योग्य तशी जुळणी करून, शोधून काढता येतील तुम्हाला हे देशसेवक? त्यांच्यातील तीन नावे आहेत दोन अक्षरी, पाच आहेत तीन अक्षरी, दोन आहेत चार-अक्षरी आणि उरलेली पाच-अक्षरी. एकदा वापरलेले अक्षर पुन्हा वापरले जाऊ नये म्हणून त्याच्यावर काट मारा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आं | | | |
| | | आ | क | | |
| | | क | क | | |
| | | ख | झा | | |
| | शा | या | रा | सा | |
| मा | वा | गो | बो | लो | फु |
| हि | टि | यी | वी | स्त्री | ले |
| | ले | डे | बे | पे | |
| | | ळ | ज | | |
| | | र | र | | |
| | | र | व | | |
| स | ल | य | ड | न | द |

## अमर वाङ्मयीन कृती

व्यास, वाल्मिकी, ज्ञानेश्वर, रामदास, तुळशीदास, विष्णुशर्मा, जयदेव, कालीदास, टागोर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि साने गुरुजी यांच्या सुप्रसिद्ध अशा एकेक वाङमयीन कृतींचे नाव पुढे दिसत असलेल्या अक्षरांच्या जंजाळातून नेमकी अक्षरे जुळवून लिहावयाचे आहे, जमेल तुम्हाला हे ? एकूण तेरा पुस्तके आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गी | गी | गी | रि | री |
| ई | ली | ची | हि | ज्ञी |
| वि | दे | गो | मे | तो |
| रा | रा | र | र | तां |
| म | म | म | मा | मा |
| मा | दा | ता | हा | भा |
| त | त | त | त | ग्र |
| ज | ज | स | स | स |
| न | ने | च | चे | यो |
| ध | प | ग | ह | बो |
| श | य | द | प | ठे |
| आ | दू | ण | प्र | न्म |
| स्य | श्व | श्या | त्या | ज्ञा |

## प्रसिध्द आत्मचरित्रे

मराठीतील काही प्रसिद्ध आत्मचरित्रे व त्यांचे लेखक ह्यांची गफलत करून पुढे दिली आहे. सांगता येईल तुम्हाला कुणाचे आत्मचरित्र कोणते ते ?

| लेखक | |
|---|---|
| १. आचार्य अत्रे | —दुधाची घागर |
| २. रँ. र. पु. परांजपे | —माझी संसारयात्रा |
| ३. ल. रा. पांगारकर | —बहुरूपी |
| ४. श्री. म. माटे | —माझ्या आठवणी |
| ५. न. चिं. केळकर | —कृष्णाकाठची माती |
| ६. धों. के. कर्वे | —स्मरणसाखळी |
| ७. लक्ष्मीबाई टिळक | —सांगत्ये ऐका |
| ८. व. शां. देसाई | —कऱ्हेचे पाणी |
| ९. वि. दा. सावरकर | —दिवस असे होते |
| १०. ग. त्र्यं. माडखोलकर | —नाबाद ८९ |
| ११. रोहिणी भाटे | —चित्रपट |
| १२. हंसा वाडकर | —स्मृतिचित्रे |
| १३. बाबुराव पेंढारकर | —मखमालीचा पडदा |
| १४. कमलाबाई देशपांडे | —माझी नृत्यसाधना |
| १५. कृ. पां. कुलकर्णी | —आत्मवृत्त |
| १६. वि. द. घाटे | —गतगोष्टी |
| १७. ग. य. चिटणीस | —दोन तपे |
| १८. चिं. ग. कोल्हटकर | —चरित्रचंद्र |
| १९. गो. स. सरदेसाई | —माझी जन्मठेप |
| २०. य. गो. जोशी | —चित्र आणि चरित्र |

□

## थोरांच्या सहधर्मचारिणी

पुढे दिलेल्या पहिल्या व तिसऱ्या रकान्यांतून काही प्रसिद्ध भारतीय व दुसऱ्या आणि चौथ्या रकान्यांतून त्यांच्या सहधर्मचारिणींची नावे विखरून दिली आहेत. येतील तुम्हाला ह्या जोड्या लावता ? उदा. राम–सीता.

| रकाना : १ | रकाना : २ | रकाना : ३ | रकाना : ४ |
|---|---|---|---|
| १ याज्ञवल्क्य | सुचेता | १३ धर्मराज | अरुंधती |
| २ धृतराष्ट्र | जिजाबाई | १४ लक्ष्मण | अहल्या |
| ३ रावण | कैकेयी | १५ राजाराम | रमा |
| ४ वसिष्ठ | शीलवती | १६ पहिले बाजीराव | सोयराबाई |
| ५ गौतम | प्रभावती | १७ शहाजी | सुधा |
| ६ हरिश्चंद्र | ललितादेवी | १८ राघोबा | कस्तुरबा |
| ७ थोरले माधवराव | मस्तानी | १९ दशरथ | कमला |
| ८ शिवाजी | ताराबाई | २० जयप्रकाश | इंदिरा |
| ९ आचार्य अत्रे | सुमित्रा | २१ लालबहादुर शास्त्री | लक्ष्मीबाई |
| १० डॉ. केतकर | द्रौपदी | २२ आचार्य कृपलानी | मंदोदरी |
| ११ महात्मा गांधी | तारामती | २३ कवि टिळक | कुंती |
| १२ जवाहरलाल नेहरू | आनंदीबाई | २४ फिरोज गांधी | मैत्रयी |

# "बौद्धिक मिठाई भाग–२" ची उत्तरे

**'श्रीगणेशायनमः' चे उत्तर**

गणेश, हेरंब, गजानन, गणाधीश, गजमुख, वक्रतुंड, विनायक, एकदंत, भालचंद्र, लंबोदर, गजवदन, गणनायक, मंगलमूर्ती.

**'शोधा हे लपलेले' चे उत्तर**

शरीरावयव : नाक, दंड, मान–पोट, पाय, पाठ, गळा.

पक्षी : कावळा, शहामृग, सुतारपक्षी, चातक, खंड्या, गवळण.

फळे : नारंगी, फणस, द्राक्षे, जांब, काकडी.

**'गुप्त म्हणी' चे उत्तर**

पहिल्या आकृतीतील पहिली म्हण शोधून काढण्याकरिता पहिल्या अक्षरापासून–'अ' पासून–सुरुवात करून, एक सोडून एक अक्षर क्रमाने शेवटपर्यंत वाचत चला, म्हणजे तुम्हाला पुढीलप्रमाणे पहिली म्हण मिळेल–'अन्नाचा मारलेला खाली पाही, तरवारीचा मारलेला वर पाही'. दुसऱ्या म्हणीकरिता, दुसऱ्या अक्षरापासून—'शि'पासून–सुरुवात करून वरीलप्रमाणेच एक सोडून एक अक्षर वाचत गेल्यावर मिळणारी म्हण–'शिकविलेली बुद्धी आणि बांधलेली शिदोरी फार वेळ पुरत नाही.'

दुसऱ्या आकृतीतील पहिली म्हण शोधून काढण्याकरिता पहिल्या अक्षराने, दुसरीकरिता दुसऱ्या अक्षराने आणि तिसरीकरिता तिसऱ्या अक्षराने सुरुवात करून, अनुक्रमे दोन दोन अक्षरे सोडून शेवटपर्यंत वाचत गेल्यास पुढील म्हणी मिळतील–'गाठचा एक बाहेरच्या शंभराबरोबर', 'राजा बोले दळ हाले, काजी बोले दाढी हाले' आणि 'चढेल तो पडेल आणि पोहेल तो बुडेल'.

**'शोधून काढा पाहू हा चोर' चे उत्तर**

चोर शोधून काढावयाची शेख साहेबांची युक्ती पुढीलप्रमाणे होती–गर्दभराजाच्या तंबूतून सारे अरब जाऊन आल्यानंतर शेख साहेबांनी त्यांना एका ओळीत उभे रहावयास सांगितले. साऱ्या काफिल्याने तसे करताच शेख साहेब प्रत्येक माणसाजवळ गेले आणि प्रथम त्याच्याकडे रोखून पाहून, नंतर त्याच्या

हाताचा वास घेऊ लागले. फक्त एका अरबाखेरीज साऱ्यांच्या हाताला गर्दभ-राजाच्या शेपटीला लावलेल्या अत्तराचा वास येत होता, आणि नेमक्या त्याच माणसाला शेख साहेबांनी चोर म्हणून ठरवले. कारण, आपण गाढवाच्या शेपटीला हात लावल्यास ते ओरडून आपली चोरी उघडकीला येईल म्हणून त्या अरबाने त्या प्राण्याच्या शेपटीला हातच लावला नाही ! म्हणूनच इतर लोकांच्याप्रमाणे त्याच्या हाताला अत्तराचा वास आलाच नाही. इथेच तो नेमका घसरला होता आणि शेख साहेबांच्या हातात सापडला.

**'कोण कोण गेले सहलीला' चे उत्तर**

१ कोल्हटकर २ फळणीकर ३ वैशंपायन ४ शृंगारपुरे
५ केळुसकर ६ कारूळकर ७ जोगळेकर ८ परुळेकर
९ इनामदार १० गऱ्हाणकर.

**'सांगा पाहू हे देशभक्त' चे उत्तर**

१. फेरोजशहा मेहता, २. लाला लजपतराय, ३. गोपाळ कृष्ण गोखले, ४. विठ्ठलभाई पटेल, ५. गोविंद वल्लभ पंत, ६. श्यामा प्रसाद मुखर्जी, ७, आचार्य विनोबा भावे, ८. बाबू राजेंद्र प्रसाद, ९. सी. राजगोपालाचारी, १०. लालबहादुर शास्त्री.

**'खेळ आणि खेळाडू' चे उत्तर**

**क्रिकेट**—हनीफ, बेदी, नायडू, नाडकर्णी, वाडेकर, हजारे; **हॉकी**–जेंटल, बलबीरसिंग, ध्यानचंद, उधामसिंग; **टेनिस**–जयदीप मुखर्जी, आर्. कृष्णन्, नरेश कुमार, प्रेमजित लाल; **कुस्ती**––दारासिंग, गणपत आंदळकर, चंदगी-राम; **गोल्फ**—भरत राम; **धावणे**—मिल्खासिंग; **फुटबॉल**—चुनी गोस्वामी, जर्नेल सिंग, मेवालाल; **बॅडमिंटन**—नंदू नाटेकर; **नेमबाजी**—कर्नीसिंग; **टेबल टेनिस**—गौतम दिवाण; **गिर्यारोहण**—पुष्पा आठवले; **जलतरण**–आरती साहा, मिहीर सेन.

**'पुऱ्या करा ह्या म्हणी' चे उत्तर**

१. तळे **राखील** तो **पाणी** चाखील; २. अति शहाणा **त्याचा बैल रिकामा**; ३, वारा **पाहून** पाठ द्यावी; ४, **ज्याच्या** हाती **ससा** तो **पारधी**: ५, नाक

दाबले म्हणचे तोंड उघडते; ६. झाकली मूठ सव्वा लाखाची; ७. गेली घडी येत नाही; ८. विशी विद्या तिशी धन; ९. काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाही; १०. अंधळ्या गाईंत लंगडी गाय प्रधान; ११. पोटचे द्यावे पण पाठचे देऊ नये; १२. आधणातले रडतात सुपातले हसतात; १३. आपला हात आणि जगन्नाथ; १३, आधी बुद्धी जाते, मग लक्ष्मी जाते; १५. खाऊ जाणे तो पचवू जाणे; १६ कर नाही त्याला डर नाही; १७ मन राजा मन प्रजा; १८-गाढवांचा गोंधळ आणि लाखांचा सुकाळ; १९- एका हाताने टाळी वाजत नाही; २० गाढवापुढे वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता.

## ' ' क ' चे कडबोळे ' चे उत्तर

१. कनक, २. कलिका, ३. कमला, ४. कलाक, ५. वलम, ६. कपोत, ७. करार, ८. करक, ९ कमाऊ, १०. करणी, ११. कवड, १२. कनात, १३. कटाक्ष, १४. कन्यका, १५. कर्तव्य, १६. कल्लोळ, १७. कचोळे, १८. कदर, १९. कफनी, २०. कपिला.

## ' शोधा हे पशुपक्षी ' चे उत्तर

अजगर, करकोचा, काकाकुवा, काळवीट, नीलगाय, पाणघोडा, शहामृग.

## ' ऐतिहासिक स्थळे ' चे उत्तर

ताजमहाल–आग्रा; विजयस्तंभ–चितोड; चार मिनार–हैद्राबाद; शहीद स्तंभ–लखनौ; आनंदभवन–अलाहाबाद; सुवर्ण मंदिर–अमृतसर; कुतुबमिनार–दिल्ली; सारनाथ स्तूप–बनारस; शांती निकेतन–पश्चिम बंगाल; बुलंद दरवाजा–फतेहपूर सिक्री; अंबर राजवाडा–जयपूर; बिबीका मकबरा–औरंगाबाद.

## ' ' टी ' पार्टी ' चे उत्तर

१ सुटी, २ रोटी, ३ बेटी, ४ पाटी, ५ माटी, ६ शिटी, ७ खोटी, ८ कुटी, ९ फाटी, १० तोटी, ११ पेटी, १२ नटी, १३ तिटी, १४ छाटी, १५ वाटी, १६ उटी, १७ लाटी, १८ बुटी, १९ सटी, २० घुटी.

## ' नद्यांच्या काठावर वसलेली शहरे ' चे उत्तर

गोदावरी – नासिक, कृष्णा – विजयवाडा, सतलज – फेरोजपूर, यमुना – दिल्ली, महानदी– कटक, झेलम– श्रीनगर, गंगा– हरद्वार, सतलज– लुधियाना,

मैयानी – चितगाँग, गंगा – कानपूर, हुगळी– कलकत्ता, गंगा-यमुना-सरस्वती– अलाहाबाद, गंगा – पाटणा, तापी – सुरत, गोमती –लखनौ, गंगा–वाराणसी.

**' ' गडी ' ची आगगाडी ' चे उत्तर**

: तागडी, पगडी, बांगडी, दगडी, बेंगडी, तंगडी, नांगडी, सौंगडी, फुगडी, पागडी, सगडी, घोंगडी, बुगडी, निगडी, जंगडी, रंगडी, लंगडी, नागडी, लंगडी, फेंगडी.

**' कशी कराल ही वाटणी ' चे उत्तर**

ते तिघे भाऊ आपले सतरा घोडे घेऊन आले, तेव्हा न्यायाधिशाने आपला एक घोडा आणून त्यांच्या रांगेत उभा केला. आता एकूण घोडे अठरा झाले.

नंतर न्यायाधीश मोठया मुलाकडे वळून म्हणाला, " मालमत्तेचा अर्धा वाटा तुझा आहे. म्हणून तूं तुझे नऊ घोडे बाजूला काढून घे." दुसऱ्या मुलाकडे बोट करून तो म्हणाला, " तुझा हिस्सा तिसरा, म्हणून तूं आपले सहा घोडे बाजूला काढून घे. " आणि शेवटी तिसऱ्या मुलाला त्याने सांगितले, " एकूण मालमत्तेचा नववा भाग तुझा–– म्हणजेच दोन घोडे तुझ्या वाटणीचे. "

आणि मग त्या तिघां भावांना उद्देशून तो म्हणाला, " तुमची वाटणी तुमच्या मृत्युपत्राप्रमाणे करून दिली. हा जो उरलेला घोडा आहे तो माझा आहे. म्हणून मी तो घेऊन जातो. "

**' श्री गणेशायनमः ' चे उत्तर**

गणपती—विघ्नहर्ता; सरस्वती—भारती, वाग्देवता, वागेश्वरी, वाग्वल्लरी, हंसवाहिनी; ब्रह्मदेव—हंसवाहन, विधाता; श्रीकृष्ण—दामोदर, रंगनाथ, शौरी; शंकर–महाकाळ ( ल ), शूलपाणि, व्योमकेश, मकरध्वज, वृषभध्वज, श्रीकंठ.

**' ' भू ' चे भगत ' चे उत्तर**

१ भूकंप, २ भूमिका, ३ भूदान, ४ भूपृष्ठ ५ भूमिती, ६ भूतात्मा, ७ भूदास, ८ भूचर, ९ भूमिया. १० भूगोल, ११ भूतोंडी, १२ भूदेव, १३ भूधर १४ भूपति भूपाल १५ भूलोक, १६ भूसुत, १७ भूरुह, १८ भूषण, १९ भूगर्भ २० भूशिर.

**' देवची देवघेव ' चे उत्तर**

देवता, देवकी, देवस्व, देवक, देवडी, देवळी, देवकळा, देवनळ, देवजन,

देववाणी, देवलोक, देवतरू, देवरुषि, देवघेव, देवदासी, देवप्रतिष्ठा, देवमाणूस, देवदेव्हारे, देवडमार, देवतार्चन.

## ' सांगा पाहू हे पहिले पहिल्यांदा ' चे उत्तर

१. डॉ. राजेंद्र प्रसाद, २. श्रीमती सुचेता कृपलानी, उत्तर प्रदेश, ३. लॉर्ड माऊंटबॅटन, ४. चक्रवर्ती राजगोपालाचारी, ५. डॉ. ॲनी बेझंट, ६. डब्ल्यू. सी. बानर्जी, ७. जवाहरलाल नेहरू, ८. जनरल के. एम्. करिअप्पा, ९. एअर मार्शल एस्. मुखर्जी, १०. व्हाइस ॲडमिरल कटारी, ११. रवींद्रनाथ टागोर, १२. सत्येंद्रनाथ टागोर, १३. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित, १४ विल्सन जोन्स. १५. शेरपा तेनसिंग, १६. मिहीर सेन, १७. आरती साहा.

## ' ओळखा पाहू राजधान्या ' चे उत्तर

आसाम–शिलाँग, बिहार–पाटणा, गुजरात–अहमदाबाद, केरळ–त्रिवेंद्रम, कर्नाटक–बंगलोर, मद्रास–मद्रास, ओरिसा–भुवनेश्वर, पंजाब–चंदीगड, राजस्थान–जयपूर, महाराष्ट्र–मुंबई, आंध्र प्रदेश–हैद्राबाद, उत्तर प्रदेश–लखनौ, मध्य प्रदेश–भोपाळ, नागा प्रदेश–कोहिमा, पश्चिम बंगाल–कलकत्ता, जम्मू काश्मीर–श्रीनगर.

## ' चालवा बुद्धी ' चे उत्तर

१ परचुरण, २ सरगरम, ३ पुरश्चरण, ४ दरडावणी, ५ भरनवती, ६ सुरयुवती, ७ हुररेवडी, ८ सौर दिवस, ९ भाकडकथा, १० निगरगट, ११ सागरगामी, १२ नटनाटकी, १३ बांदबंदस्ती, १४ समराभरी, १५ नवजीवन, १६ परिचारिका १७ फळफळाट १८ खरखाट १९ मातापितरे २० दुराचरणी.

## ' निवडा हे शब्द ' चे उत्तर

१ परमेश्वर, २ आकाशवाणी, ३ निष्कपट, ४ तत्पर, ५ अति बुद्धिमान, ६ लोणचे, ७ गवळण, ८ पट्टराणी, ९ शाई, १० श्रीमंत, ११ फजिती, १२ आसन, १३ रामपात्र, १४ पश्चात्ताप.

## ' तुमचे सामान्यज्ञान–१ ' चे उत्तर

१. उषःकालीन भूमी–संस्कृत ' उप्पस् ' वरून; २. तीन मैलपर्यंत; ३. वास्को डी गामा; ४. मिकॅडो; ५. २,४०,००० मैल; ६. दर दहा वर्षांनी; ७. यांत्रिक

मनुष्य; ८. दगड; ९. सहा तास. उदा. बारा वाजले असतील, तर जास्तींत जास्त मागे–पुढे सहा तास होईल; १०. २४ कॅरेट; ११. इंग्लंड; १२. चित्तरंजन, बंगाल; १३. बंगलोर; १४. पॅसिफिक, अटलांटिक आणि हिंदी महासागर; १५. सहा महिने; १६. सिंधू नदी; १७. शून्य; १८. शहामृग; १९. मादाम क्युरी–रेडियमचा शोध लावला.

## ‘ शरीरावयवी वाक्प्रचार-१ ’ चे उत्तर

१. विशिष्ट हेतूने जिवंत राहणे; २. वैभवास चढणे; ३. कार्याला सिद्ध होणे; ४. अक्कल कमी होणे; ५. वचनात अडकणे; ६. थोबाडीत मारणे; ७. अनियंत्रित बोलणे; ८. नावलौकिकास चढणे; ९. कल जाणणे; १०. मध्येच बोलणे; ११. दुर्गंधी असह्य होणे; १२. कामात कुचरपणा करणे; १३. पूर्णपणे उपभोग घेणे; १४. पोट भरणे; १५. विश्वासघात करणे; १६. तुच्छता दर्शविणे.

## ‘ इंग्रजी-मराठी ’ चे उत्तर

एक्का, बीड, बीज, सीमा, सीधा, डीक, ईश, ईद, ईसा, जीव, जीन, आयता, आयना, केव्हा, केका, ओघ, ओढा, ओस, ओटा, पीळ, पीठ, पीडा, पीक, टीक, टीका, टीपा, वायल, वायन, वायदा.

## ‘ व्हा संशोधक ’ चे उत्तर

डाईमलर–मोटार, मॅकमिलन–सायकल, स्टिफन्सन–रेल्वे इंजिन, वॉटरमन–फाऊंटन पेन, ब्रेक्वेट–हेलिकॉप्टर, एडिसन–फोनोग्राफ, कुक्रेल–हॉवर क्रॉफ्ट, जेम्स वॅट–वाफेचे इंजिन, बर्लिनर–मायक्रोफोन, होवे–शिवणयंत्र, बुशनेल–सबमरीन, शॉक्ले–ट्रान्झिस्टर, शोल्स–टाइपरायटर, बायर्ड–टेलिव्हिजन, टॉरिसेली–बॅरॉमीटर, राईट बंधू–विमान.

## ‘ ओळखा ह्या उपमा ’ चे उत्तर

गुंजेसारखा, पालीसारखा, तिळ्यासारखा, कालासारखे, शेळीसारखा, विषासारखा, सर्पासारखा, सुंभासारखा, कातड्यासारखी, कापरासारखे, कोळशासारखा, तक्षकासारखा, भाकरीसारखा, नक्षत्रासारखी, रेशमासारखी, साखरेसारखा, जमदग्नीसारखा, घोरपडीसारखा, नव्या नवरीसारखा.

**' शब्दपट ' चे उत्तर—**

| | | |
|---|---|---|
| १ अ | २ ना | ३ र |
| ४ ना | पा | स |
| ५ र | स | ना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ का | ग | दी | ल | बा | २ न |
| र | | | | | ट |
| खा | | | | | न |
| न | | | | | थ |
| नी | | | | | ट |
| ३ स | डा | सं | मा | र्ज | ४ न |

**' तुमचे सामान्यज्ञान-२ ' चे उत्तर**

१. रोममधील सेंट पीटर्सचे मंदिर, २. तासाला सात मैल, ३. ॲनाफेलिस, ४. रशियाचे साम्यवादी मुखपत्र ५. ९३,०००,००० मैल, ६. आर्टिक्ट, अंटार्टिक, उत्तर पॅसिफिक, दक्षिण पॅसिफिक, उत्तर अटलांटिक, दक्षिण अटलांटिक आणि हिंदी महासागर, ७. हिवाळ्यात, ८. दक्षिण ध्रुवावर. ९. जिराफ-जवळ जवळ वीस फूट उंच, १०. नाही. पृथ्वी फिरत असल्यामुळे तसे वाटते, ११. प्रकाशाचा, १२. हिरा, १३. आधुनिक खगोलाचा पिता, १४. जॉर्ज स्टिव्हन्सनने, १५. ब्ल्यू व्हेल मासा—तो जवळ १११ फूट लांब असतो आणि त्याचे वजन १०० टन, १६. नाही. सोंडेत पाणी घेऊन तो ते तोंडात सोडतो,

१७. एकच–चंद्र, १८. सिंद्री ( बिहार ) येथे, १९. भारताची—सिमला, दिल्ली, २०. विश्वमान्य भाषा.

**' शरीरावयवी वाक्प्रचार—२ 'चे उत्तर**

१. आसन्नमरण होणे, २. उपद्रव होणे, ३. निराश होणे, ४. विनंती अमान्य करणे, ५. पेचात सापडणे, ६. शेखी मिरवणे, ७. खाण्यास उत्सुक असणे, ८. संमती देणे, ९. दृष्टीस न पडणे, १०. गुप्त गोष्ट बाहेर न पडू देणे, ११. वरचढ असणे, १२. पळून जाणे, १३. विस्तार करणे, १४. चरितार्थाचे साधन गमविणे, १५. हीन स्थितीतून वैभवाला येणे, १६. लाच देणे.

**' शब्दपट 'चे उत्तर—**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १ ज | | |
| | २ क | ल | म | |
| ३ ज | ल | त | र | ण |
| | ४ म | र | ण | |
| | | ५ ण | | |

**' शब्दसोपान 'चे उत्तर—**

१. करद, २. ठोकर, ३. करणी, ४. मकर, ५. करतल, ६ सप्तकर, ७. करकोचा, ८. टोपीकर, ९. करमणूक, १० रजनीकर, ११. करग्रहण, १२. सहस्रकर, १३. करदनकाळ, १४. अकरनकर, १५. करक.

**' सांगा पाहू ' चे उत्तर**

**अटकळपंचविशी, एक अक्षरी शब्द**—१ क, २ शी; **दोन अक्षरी शब्द**–३ अट, ४ चट, ५ विट, ६ शीट, ७ कट, ८ टक, ९ पंक, १० पंच, ११ टच, १२ कच, १३ कवि, १४ कळ, १५ चळ, १६ शीळ, १७ अशी, १८ कशी,

१९ विशी—**तीन अक्षरी शब्द**, २० अटक, २१ कटक, २२ चटक, २३ अटळ २४ विकळ, २५ विकट, २६ अळशी, २७ कळशी, २८. कळक, २९ अचळ, ३०. पंचक.

**'खोगोठोडोहोवो'चे उत्तर**

खो–नाश, विपत्तिकाळ; **गो**–गाय, अग; **ठो**–लहान मुले आपल्या कपाळाने दुसऱ्याच्या कपाळावर हळूच आघात करतात, तो; **डो**–डोके; **हो**–संमतिदर्शक शब्द; **वो**–अहो

**' शब्दांशी झटापट 'चे उत्तर**

कवन, पटल, वावडी, वारस, नमन, खीर, सार, नामो, दळ, सण, माल, ताण, तमा, नान, रव.

**' प्राण्यांवरून आलेले शब्द ' चे उत्तर**

१–९; २–८. ३–७; ४–६; ५–५; ६–४; ७–३, ८–२, ९–१; १०–१५; ११–१४; १२–१३: १३–१२; १४–११; १५–१०.

**' निवडा हे शब्द-२ ' चे उत्तर**

१. न थांबता एकसारखे पळणे, २. नेहमी असत्य बोलणारा, ३. कवडी-चुंबक, ४. अत्यंत बेफिकीर, ५. सावध झोप, ६. श्रीमंत, उदार मनुष्य, ७. न थांबता, ८. कृपणता, ९. नसती उठाठेव, १०. सरळ, रुंद मोकळा रस्ता, ११. अत्यंत दरिद्री माणूस. १२. आपमतलबी मत.

**' ' पर ' ची परंपरा ' चे उत्तर**

१. परडी, २. परत्र, ३. परवा, ४. परम, ५. परशु, ६. परका ( की ), ७. परती, ८. परता, ९ परस्व, १० परडे, ११. परकोट. १२. परमार्थ, १३ परवड, १४. परवचा, १५. परभारा, १६. परकाई, १७. परचक्र, १८. परवाना, १९, परदेशी ( परकीय ), २० परमाणू.

**' सामाजिक चळवळींचे पुढारी ' चे उत्तर**

१. राजा राममोहन राय, २. स्वामी दयानंद, ३. स्वामी विवेकानंद, ४. गोपाळ कृष्ण गोखले, ५. ना. म. जोशी, ६. जवाहरलाल नेहरू, ७. विनोबा

मावे, ८. धोंडो केशव कर्वे, ९. महात्मा गांधी, १०. श्रीमती ब्लॅव्हॅट्स्की, ११ बेडन पॉवेल, १२. हेन्री डुरांट.

**' नेत्यांची ' लाडकी ' नावे 'चे उत्तर**

**बापू**–मोहनदास करमचंद गांधी; **गुरुजी**–मा. स. गोळवलकर; **नेताजी**–सुभाषचंद्र बोस; **गुरुदेव**–रवींद्रनाथ टागोर; **देशबंधु**–चित्तरंजन दास; **लोकमान्य**–बाळ गंगाधर टिळक; **स्वातंत्र्यवीर**–विनायक दामोदर सावरकर; **पंजाब केसरी**–लाला लजपत राय.

**' देश आणि राजधान्या–१ 'चे उत्तर**

१. नवी दिल्ली, २. काबूल, ३ डाक्का, ४. कोलंबो, ५. टोकिओ, ६. व्हीएन्ना, ७. बगदाद, ८. रोम, ९. इस्लामाबाद, १०. ओटावा, ११. पेकिंग, १२. रंगून, १३. कॅनबरा, १४. हवाना, १५. तेहरान, १६. पॅरीस, १७. स्टॉकहोम, १८. ब्युडापेस्ट, १९. ब्रुसेल्स, २०. नैरोबी, २१. कोपनहेगन, २२. बर्न, २३. ब्युनोस आयर्स, २४. जकार्ता, २५. बर्लिन, २६. माद्रीद, २७. बॉन, २८. केप टाऊन, २९. प्राग, ३०. अथेन्स.

**' देश आणि राजधान्या–२ 'चे उत्तर**

१. तेल अवीव, २. डब्लीन, ३. बँकॉक, ४. अंकारा, ५. मॉस्को, ६. अम्मान, ७. लिस्बन, ८. बैरूत, ९. वेलिंग्टन, १०. दमास्कस, ११. लंडन, १२. काठमांडू, १३. कैरो, १४. वॉरसा, १५. ओस्लो, १६. तायपेय, १७. कंपाला, १८. सायगॉन, १९. हनोई, २०. बेल्ग्रेड, २१. वॉशिंग्टन डी. सी. २२. दार–एस–लाम, २३. मनीला, २४. आदिस अबाबा.

**' थोर देशसेवक 'चे उत्तर**

दोन अक्षरी–बोस, शास्त्री, फुले; तीन अक्षरी–टिळक, गोखले, रानडे, लोहिया, आझाद; चार अक्षरी–मालवीय, वाजपेयी; पाच अक्षरी–आंबेडकर, सावरकर.

**' अमर वाङ्मयीन कृती 'चे उत्तर––**

महाभारत, रामायण, ज्ञानेश्वरी, दासबोध, रामचरितमानस, हितोपदेश, गीतगोविंद, मेघदूत, गीतांजली, गीतारहस्य, सत्याचे प्रयोग, माझी जन्मठेप, श्यामची आई.

**'प्रसिद्ध आत्मचरित्र 'चे उत्तर—**

१. कऱ्हेचे पाणी, २. नाबाद ८९, ३. चरित्रचंद्र, ४. चित्रपट, ५. गतगोष्टी ६. आत्मवृत्त, ७. स्मृतिचित्रे, ८. मखमालीचा पडदा, ९. माझी जन्मठेप, १०. दोन तपे, ११. माझी नृत्यसाधना, १२. सांगत्ये ऐका, १३. चित्र आणि चरित्र, १४. स्मरणसाखळी, १५. कृष्णाकाठची माती, १६. दिवस असे होते, १७. माझ्या आठवणी, १८. बहुरूपी, १९. माझी संसारयात्रा, २०. दुधाची घागर.

**' थोरांच्या सहधर्मचारिणी 'चे उत्तर**

१. मैत्रेयी, २. कुंती, ३. मंदोदरी, ४, अरुंधती, ५. अहल्या, ६. तारामती, ७. रमा, ८. सोयराबाई, ९. सुधा, १० शीलवती, ११. कस्तुरबा, १२. कमला, १३. द्रौपदी, १४ सुमित्रा, १५. ताराबाई, १६. मस्तानी, १७. जिजाबाई, १८. आनंदीबाई, १९. कैकेयी, २०. प्रभावती, २१. ललितादेवी, २२. सुचेता, २३. लक्ष्मीबाई, २४. इंदिरा.

म. ग्रं. सं. ... वाचनालय ठाणे.
क्रा. क्र. ३०८
विभाग चित्रपट ... ३८६
BVBK-0400307